महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

# पक्षिमित्र

■ वर्ष अकरावे ■ अंक ४ था ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ जुलै २०२१ ■ पाने -२४



## संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**

३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५

स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

**सहाय्यक संपादक**

**श्री. अनिल माळी,** नाशिक, मो. ९८५०८१८६४४

Email: anilrmali@yahoo.co.in

**श्री. किरण मोरे,** अमरावती, मो. ९९२३९१००३४

Email: kiranmorey1983@gmail.com

### कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | - | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>मो. ९००४९२४७३१ |
| संघटक | - | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | - | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| सहकार्यवाह | - | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>मो. ९८९०३८४४०० |
| सहसंघटक | - | **श्री. अनिल माळी**, नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सदस्य | - | **प्रा. निनाद शाह**, सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | - | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | - | **श्री. रोहन भाटे**, कराड (सातारा)<br>मो. ९४२२००४८०० |
| सदस्य | - | **श्री. सचिन मेन**, पालघर<br>मो. ८४४६२४८८८४ |
| सदस्य | - | **श्री. अनिल महाजन**, वरणगाव-जळगाव<br>मो. ८८०६१९८०४० |

### सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| **श्री. भाऊ काटदरे** | **(चिपळूण)** | **मो. ९४२३८३१७००** |
| **श्री. दिगांबर गाडगीळ** | **(नाशिक)** | **मो. ९८८१०७९७११** |
| **डॉ. दिलीप यार्दी** | **(औरंगाबाद)** | **मो. ९४२२७०४२२१** |
| **डॉ. अनिल पिंपळापुरे** | **(नागपुर)** | **मो. ९८८१७१३४६६** |
| **श्री. बापुसाहेब भोसले** | **(अहमदनगर)** | **मो. ९८२२६३३१३३** |


## संपादकीय

### अमेरिकेतील वॉशिंग्टन आणि मृत पक्षी




**दिगंबर गाडगीळ**

संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक

dgadgil09@gmail.com


या वर्षीच्या मे महिन्यात अमेरिकेच्या वॉशिंग्टन डी.सी. या महानगरात लोकांच्या अंगणात पक्षी मरून पडत असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. काही अंगणात पक्षी गोंधळल्यासारखे फिरू लागले. बहुतेकांना किमान एका डोळ्याने दिसत नव्हते वा त्यांच्या मेंदूवर परिणाम झाल्यासारखे दिसत होते. त्यांचा तोल जात होता. अशा पक्ष्यांमध्ये लहान वयाचे ग्रॅकल, मैना, नीलपंख यांचा भरणा होता. हे का घडते आहे, याची चर्चा सुरू झाली. वृत्तपत्रे, टीव्हीवर बातम्या झळकल्या आणि त्याचा उलगडा झाला.

याच महिन्यात ‘क्ष’गटाचे सिकाडा हे कीटक १७ वर्षांनी अवतरले होते. किती? तर सुमारे १ ट्रिलियन (१० वर १२ शून्य) सकाळी १० वाजल्यापासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ते कर्कश आवाजात किरकिर करत राहतात. बटबटीत डोळ्यांचे हे सिकाडा हवेत झेपावू लागले की, पक्षी, सरडे, पालीसारख्या प्राण्यांची चंगळ. सिकाडाचा त्रास कमी करण्यासाठी नागरिकांनी कीटकनाशकांचे फवारे उडवले होते. हे मेलेले किडे पक्ष्यांनी टिपले होते आणि त्यासोबत हे जंतुनाशकही त्यांच्या पोटात शिरले होते. त्यांनी हा प्रताप गाजवला होता.

हे सिकाडा जेमतेम महिनाभर भिरभिरत असतात. मीलन झाले की, ते थंडे होतात. त्यांची अंडी जमिनी पडताच त्यातून पुन्हा १७ वर्षांनीच पुढची पिढी जन्माला येते. महापालिकेने व सरकारने त्यांच्यावर कीटकनाशक फवारू नका, असे आवाहन केले. तोपर्यंत भरपूर पक्षी हानी झालेली होती.

आपल्याकडेही पहिला पाऊस झाला की, विविध जातींचे किडे-कीटक पैदा होतात व त्याच वेळेस पक्षी सृष्टीची पुढची पिढी जन्माला आलेली असते. त्यांचे आईबाप त्यांनाही किड्या-कीटकांचा खुराक भरवत असतात. शेतातून फवारलेल्या कीटकनाशकांमुळे मधमाशा तर खूप कमी झाल्या आहेत. इतर कीटकही कमी झाले आहेत. जैवविविधतेनेचा ऱ्हास होत आहे. तेव्हा शेतकऱ्यांनी बागायतदारांनी कीटकनाके फवारू नयेत, ऑर्ग्यानिक शेती करावी, असे आवाहन पुन:पुन्हा करावे लागत आहे.

*****

* **मुखपृष्ठ :-** पावसाळ्याची सुरूवात म्हणजे कोकीळा आणि चातक (कक्कू) प्रजातींच्या पक्ष्यांचा विणीचा हंगाम. अनेक स्थानिक तसेच स्थलांतरीत कक्कू पक्षी यावेळी दिसत असतात किंवा त्यांचे आवाज तरी येत असतात या कुळातील अनेक प्रजाती यावेळी मुखपृष्ठावर एकत्रितपणे देण्यात आल्या आहेत.

**मुखपृष्ठ छायाचित्र - श्री.समिश धोंगळे, श्री.मनिष मुऱ्हेकर**

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

मागील वर्षी सुरु झालेले कोरोनाचे संकट २०२० च्या अखेरीस निवळत गेले तसा आपण सर्वांनी निश्वास सोडला. २०२१ ची सुरुवातसुद्धा आशादायक होती. हे संकट लवकरच टळेल, असे वाटत असताना प्रत्येकाने आपल्या पुढील कार्यक्रमांचे नियोजनसुद्धा केले होते. महाराष्ट्र पक्षीमित्रचे कोरोनामुळे स्थगित झालेले यावर्षीचे ३४ वे राज्यस्तरीय संमेलन सोलापूर येथे एप्रिल २०२१ मध्ये घेण्याचे पुन्हा ठरविण्यात आले. परंतु फेब्रुवारी–मार्चमध्ये कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने पुन्हा डोके वर काढले आणि होऊ घातलेले संमेलन, आपले सर्वच वैयक्तिक कार्यक्रम पुन्हा स्थगित करावे लागले. हळूहळू जोर वाढत गेला. त्यातच आपला एप्रिलचा अंक तयार होऊन सर्वांना घाईघाईने रवाना करता करता परत कडक लॉकडाऊन लागले. परिस्थिती बिकट होत गेली. रुग्णांची संख्या वाढत गेली. मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले. औषधांचा तुटवडा, ऑक्सिजनचा तुटवडा आणि मृत्यू हे दुष्टचक्र जवळपास सर्वांनीच अनुभवले. अनेकांचे जवळचे आप्त स्वकीय – मित्र या लाटेने ओढून नेले. आपल्या महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजीवन सभासद असलेले अहमदनगरचे ज्येष्ठ पक्षिमित्र श्री. कार्तिकस्वामी इंगळे यांचे या कोरोना काळात दुःखद निधन झाले. उत्कृष्ट पक्षी छायाचित्रकार, अभ्यासक व मार्गदर्शक असलेले इंगळे सर यांचेशी माझे नेहमीच बोलणे होत असे. त्यांच्या जाण्यामुळे महाराष्ट्र पक्षीमित्र एका ज्येष्ठ सभासदास मुकली आहे.

आपले दुसरे सभासद ज्ञानेश्वर ठाकूर ऊर्फ ठाकूर काका (खारघर) यांचेसुद्धा कोरोनामुळे दुःखद निधन झाले. आपल्या निवृत्तीनंतर ते पक्ष्यांच्या जीवनावर माहितीपट तयार करून, यू-ट्यूबवर उपलब्ध करून देत असत. याशिवाय ते परिसरातील शाळांमध्ये स्वतः जाऊन शिक्षकांना विनंती करून विद्यार्थ्यांना पक्षिविषयक सादरीकरण करून पक्षी जनजागृती करीत असत. त्यांच्या व्हिडीओमधून ते आपल्या कायम स्मरणात राहतील.

संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असलेले पक्षी छायाचित्रकार, अभ्यासक आणि ताडोबा व चंद्रपूर जिल्ह्यातील जंगलात गेल्या २० वर्षांत अतोनात भटकंती केलेले आपले सभासद लतीश डेकाटे (चंद्रपूर) यांचेसुद्धा या काळात दीर्घ आजाराने निधन झाले. लहान आकाराच्या व दुर्मीळ प्रजातींच्या निरीक्षणातून त्यांनी खूप माहिती मिळवली होती आणि त्यांचे अनुभव ते तरुण आणि नवोदित अभ्यासकांना वाटत असत. या अनुभवी सभासदांच्या जाण्याने निश्चितच एक पोकळी निर्माण झाली आहे. महाराष्ट्र पक्षीमित्रकडून त्यांना श्रद्धांजली.

गेल्या तीन महिन्यांच्या काळात कोरोना परिस्थिती गंभीर असल्याने व लॉकडाऊनमुळे प्रत्यक्षात काही कार्यक्रम झाले नसले तरी काही चांगल्या गोष्टी घडल्या आहेत. लॉकडाऊन असले तरीही आपले पक्षिमित्र इंटरनेटच्या माध्यमातून, वेगवेगळ्या वेबिनारच्या माध्यमातून संपर्कात होते, आणि पक्षिविषयक माहितीची देवाणघेवाण सुरू होती, ही समाधानाची बाब म्हणता येईल.

दोन पुरस्कार दिले जात असतात. नवीन पक्षी निरीक्षक व पक्षी अभ्यासक घडावेत, यासाठी, पक्षी अभ्यासात रुची दाखविणारे, अगदी शाळा महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'हियर ऑन प्रोजेक्ट एनव्हार्नमेंट' अर्थात होप ठाणे, या संस्थेकडून महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनामध्ये उदयोन्मुख पक्षिनिरीक्षक व उदयोन्मुख पक्षिमित्र असे दोन पुरस्कार दरवर्षी दिले जात असतात. यावर्षी या पुरस्कारांसाठी निवड प्रक्रिया महाराष्ट्र पक्षीमित्रकडून राबविण्यात आली आणि हे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून उदयोन्मुख पक्षिनिरीक्षक पुरस्कार, किरकसाल, जि. सातारा येथील चि. चिन्मय प्रकाश सावंत यास, तर उदयोन्मुख पक्षिमित्र पुरस्कार सोलापूर येथील श्री. राहुल श्रीकृष्ण वंजारी व साकोली जिल्हा भंडारा येथील कु. मृणाली कमलाकर राऊत यांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. पुरस्कार प्राप्त नवोदितांचे हार्दिक अभिनंदन.

महाराष्ट्र पक्षीमित्रचे माजी अध्यक्ष श्री. भाऊ काटदरे तथा पक्षीमित्रचे आजीवन सदस्य श्री. प्रेमसागर मेस्त्री यांच्या कार्याची माहिती १२ वीच्या अभ्यासक्रमात एका पाठात समाविष्ट करण्यात आली आहे. भाऊ यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असून त्यांनी आजवर अनेक प्रजातींच्या संवर्धनासाठी कोकण भागात कार्य केले आहे. भाऊंच्या कार्याचा महाराष्ट्र पक्षीमित्रला अभिमान आहे. श्री. भाऊ काटदरे आणि श्री. प्रेमसागर मेस्त्री यांचे हार्दिक अभिनंदन.

पक्षिमित्र हा आपला अंक आता अनेकांकडून वाखाणला जाऊ लागला आहे. याचीच पावती म्हणजे, महाराष्ट्र पक्षीमित्रच्या पक्षिमित्र अंकात लिखाण करणाऱ्यांना आकाशवाणी नागपूरकडून त्यांचे पक्षी विषयक अनुभव कथन करण्यासाठी संधी मिळाली आहे. या अंतर्गत

७-८ लेखकांचे अनुभव जागतिक जैवविविधता दिवस निमित्ताने १५ दिवसांची मालिका स्वरूपात प्रसारित झाले आहेत तसेच जून व जुलै महिन्यातसुद्धा काही पक्षिमित्रांचे अनुभव कथन आपल्याला ऐकायला मिळणार आहेत, ही महाराष्ट्र पक्षीमित्रसाठी एक चांगली संधी मिळाली आहे. यासाठी सहकार्य करणारे कार्यक्रम अधिकारी श्री. मनोज जैन यांचे मनस्वी आभार.

समाज माध्यमांचा वापर करून महाराष्ट्र पक्षीमित्रकडून पक्षिविषयक व संस्थेच्या कार्यविषयक माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचा आपला प्रयत्न आहे. याचाच एक भाग म्हणून आपले इंस्टाग्रामवर खाते तयार करून त्यावर पक्षी विषयक माहिती प्रसारित करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. यासाठी आपला तरुण पक्षिमित्र शशांक नागराळे आपला वेळ देऊन हे काम करीत आहे. आपण या पेज ला भेट देऊन हे पेज शेअर करावे.

दोनदा स्थगित झालेले सोलापूर येथे होणारे ३४ वे संमेलन बहुतेक दिवाळीनंतर आयोजित करण्याचा मानस आहे. परिस्थिती बघून पुढील तारीख ठरविण्यात येईल. कोरोना काळात सर्वांनी काळजी घ्यावी, ही विनंती.

*****

# आपल्या माहितीला उजाळा प्रश्नावली

| क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १) | --------साली मोर या पक्ष्याला 'भारताचा राष्ट्रीय पक्षी' हा दर्जा मिळाला. | या वर्षी नागालॅण्ड राज्याची स्थापना झाली. |
| २) | सरपटणारे प्राणी व पक्षी यांचा दुवा मानले जाणारे जिवाश्म आर्किओप्टेरिक्स. आर्किओप्टेरिक्स--- देशात शोधला. | हा देश युरोप खंडात आहे. |
| ३) | --- हा पक्षी स्वत:च्या घरट्यामध्ये सर्व पक्ष्यांच्या तुलनेत सर्वाधिक अंडी घालतो. | हा पक्षी उडू शकत नाही. |
| ४) | महाराष्ट्राचा राज्यपक्षी जीवशास्त्रीयवर्गीकरणातल्या ------ या कुटुंबात .गणला जातो. | Treron phoenicoptera हे त्याचे शास्त्रीय नाव आहे |
| ५) | सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील पक्षी अभयारण्य ----- पक्ष्यांसाठी सुप्रसिद्ध आहे. | हा संकटग्रस्त पक्षी आहे. |
| ६) | पक्ष्यांच्या घरट्यासंबंधी अभ्यास करणारी ज्ञानशाखा म्हणजे -------- | यामध्ये घरट्यांची रचना आणि अंड्याचेही अध्ययन करतात. |
| ७) | निलपंख हा --------चा शहर पक्षी आहे. | हे शहर नागपूर प्रशासकीय विभागात आहे. |
| ८) | -------- हा उत्तर प्रदेश राज्याचा राज्यपक्षी आहे. | हा भारतातील सर्वांत उंच पक्षी आहे, |
| ९) | Anatidae या पक्षी कुटुंबात ------- या पाणपक्ष्यांचा समावेश होतो. | यांची चोच चपटी असते. |
| १०) | ---------याला माळावरच्या धावपटू असेही समजतात. | याला मागचे बोट Halin नसते |

**उत्तरे :** १) १९६३, २) जर्मनी, ३) शहामृग, ४) कोलंबिडी (Columbidae), ५) माळढोक, ६) Nidology, ७) वर्धा, ८) सारस क्रौंच, ९) बदक, १०) धाविक

# पाणी



**संजय कोपलवार**
नांदेड
sanjaykompalwar@gmail.com

पाणी हेच जीवन आहे. ह्याचे सर्वात मूर्तिमंत उदाहरण बघायचे असेल तर, जंगलातील पाण्याचे स्रोत आटत जाताना वन्यप्राण्यांची अगतिकता, त्यांची पाण्यासाठीची भटकंती आणि त्यांचे जीवन अभ्यासल्यावर जे महत्त्व पाण्याचे कळते तेवढे इतरत्र नाही कळणार असे वाटते. आमचा शेतकरी जो पशुपालकही आहे त्यांना चांगली कल्पना असते. दुष्काळ पडलेला असताना गावात पाण्यासाठीची चर्चा होताना मन हेलावणारे एक वाक्य ऐकायला येतं, 'आपले काही तरी होईल रे पण ह्या मुक्या प्राण्यांचे कसे होईल?' जिथे पालक आहेत तिथे ही चिंता तर वन्यजीवांचे काय हाल असतील? कल्पनाच करावी वाटत नाही, आम्हा निसर्ग भटकणाऱ्याना.

तर सांगायचे असे आहे, जूनचा महिना. आम्ही सख्या सोबत्यांसोबत जंगल जंगल करायला ताडोबात गेलेलो. या दिवसात वाघ बऱ्यापैकी बघायला मिळतात. कारण पाण्याचे स्रोत कमी झालेले असतात. त्यांना या दिवसात दोन वेळा तरी पाणी लागतेच. कारण उन्हाची काहिली आणि शरीराचे तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी हमखास पाण्याच्या स्रोताशिवाय पर्याय रहात नाही. म्हणून ही ठिकाणं हमखास वाघाच्या दर्शनाची ठिकाणं ठरतात. त्याच उद्देशाने आम्हीही जिप्सीत स्वार झालेले. जिप्सी जंगल वाटेनं धावत होती. जंगल वाटा या वठलेल्या फुफूरड्याचा धुरळा उडवत आगेकूच सुरू होती. मी आणि माझ्या सोबत्यांनी जिप्सीच्या ड्रायव्हर आणि गाईडचे वेसण आधीच ओढून सांगितले, आम्ही वाघ तर बघायला आलेलोच; पण त्या सोबत जंगल वैभव पण बघायचे आहे. तेव्हा तुझी गाडी बैलगाडी सारखी चालू दे. तोही ओळखला, म्हणजे आमच्याकडे बघत काय हे विचित्र प्राणी दिसतात. असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर जाणवले. मग निमुटपणे आमची जिप्सी बैलगाडी बनली. तसे नंतर त्यांनी अभिमानाने सांगितले की, साहेब हे जंगल, पक्षी इतर प्राणी कोणी बघत नाहीत हो, पर्यटकांना फक्त वाघ बघायचा असतो, म्हणून पळवत होतो. गाईड आणि ड्रायव्हर दोघांनीही आम्हाला काय पाहिजे ते ओळखले. मग निवांत भटकंती सुरू झाली.

सागवान हे उन्हाळ्यात पानगळ होऊन रखरखीत होतं. निष्पर्ण फांद्यांवर अनेक छोटे छोटे पक्षी जे एरव्ही सहज दिसत नाहीत ते या उघड्या फांद्यांवर राज करतात. कारण त्यांना शिकारी पक्षी; पण भक्ष्य नाही करू शकत. मी अनेक भ्रमंतीनंतर पिवळ्या छातीची चिमणी याच झाडावर कॅमेरात क्लिक केलेली. तसेच नाचणी, टकाचोर, विविध सातभाई वगैरे पक्षी या दिवसात दिसतातच. वाळलेल्या पानावरून फिरणारे निलगाय, चितळ, सांबर, भेकर, रानडुक्कर, रानकोंबडे, रानकुत्रे, अस्वल, रानगवे असे वन्यजीव जिप्सी हळू नेली तरच दिसण्याचा संभव असतो. एका सागाच्या झाडावर खळग्यात घुबडाचे घरटे होते. आम्हाला गाईड दाखवतो. त्यात ती घुबडे आहेत दोन आणि तीही पिल्लं (Scops Owl, कंठी पिंजरा घुबड). पण आम्हाला दिसत नव्हते. कारण मी पहिल्यांदा इथेच बघितले हे घुबड. अगदी बेमालूम असतात झाडाशी एकरूप. सहज ओळखताही येत नाहीत. जंगल वाचनाची एक नजर हवी असते यासाठी. पुढे गेलो तर समोरून रानकोंबडे पळत झुडपाआड गेले. त्यांचे आरवणे सुरू झाले. हा आवाज कानासह जंगलात घुमू लागतो, अगदी अवर्णनीय असा. पुढे एका बांबू बेटाजवळ रानडुक्कर कुसपूस करत अचानक बाहेर निघतं. बांबूचे कंद हा त्यांचा मुख्य आहारच आहे. त्यामुळे इथले बांबूचे बेट त्यांचे आश्रय स्थान ठरते.

असे वन्य प्राणी, पक्षिनिरीक्षण करत करत आम्ही एका पाणवठ्यावर पोहचलो. तर सर्व जिप्सी आमच्या अगोदरच तिथे उभ्या असलेल्या. त्यांना फक्त वाघ बघायचा असावा. पाच मिनिटे गेली, दहा मिनिटे गेली. कोणीच मोठा जीव येईनात पाण्यावर. मात्र छोट्या छोट्या पक्ष्यांचे पाणी पिणे, भुर्रकन उडणे सुरू होते. त्यांच्या किलबिलीमध्ये आपण किती वेळेचे इथेच थांबलेलो आहोत याचाही विसर पडलेला. पाण्यावर झुंबड होती कोतवाल, टकाचोर, तांबट, गाय बगळे, धीवर, असे अनेक पक्षी पाणी प्यायचे आणि उडून जायचे. आमच्या कॅमेरात काही कैद झाले, काही सुटले. अचानक अवतरला स्वर्गीय नर्तक. त्या पक्ष्याचा रूबाब काही वेगळाच. पाण्यात डुबकी मारायचा, पाणी प्यायचा आणि उडत जाऊन तळ्याकाठीच्या झाडाझुडपावर बसायचा. लांबलचक त्याची शेपटी, पंख पांढरेशुभ्र धवलवर्णी. उडताना स्वर्गातील परी उडत येत आहे आणि पाणी प्राशून जात आहे, असाच भास झाला. डोळ्याचे पारणे फिटणे म्हणतात ना तो अनुभव आला.

नंतर एकाकी शांतता पसरली, जंगलाचा राजा शक्यतो आगमन करीत आहे असे वाटत होते. त्याचा दरारा यावरूनच समजतो. पण तो काही आला नाही तर येत होते नर भेकर, पण हळूच दबक्या पावलाने.

अहाहा, सुंदर नाजूक प्राणी. नजर लागेल असाच. तो दबकत दबकत पाणवठ्यावर येत होता; पण त्याची हिंमत काही होत नव्हती. दोन-चार पाऊल पुढे टाकायचा आणि सावधगिरीने मागे-पुढे कान टवकारून बघायचा आणि परत पळून जायच्या मन:स्थितीत दिसायचा. पुन्हा परत वळून पाच-दहा पावले मागे जायचा आणि पाण्याच्या दिशेने तोंड करून थांबायचा. असा हा धगधगता उन्हाळा, उष्णतेने उच्चांक गाठलेला. तो पाण्यासाठी व्याकूळ झालेला. पण दहशत मरणाची, शिकार होण्याची. म्हणून सावधगिरी बाळगत होता. त्याला आजुबाजूला वाघ असल्याची जाणीव झालेली असावी. तो पाणी पिताना आपल्यावर झडप मारेल ही भीती पण होतीच. असे ब्याचदा करत होता. अगदी सावधपणे पुढे यायचा आणि दचकून मागे फिरायचा. थांबायचा आणि पुन्हा पुढे यायचा. असे बराच वेळ सुरू होतं. त्याची ही भावपूर्ण हालचाल टिपताना लक्षात आलं पाणी तर प्यायचे आहे आणि जीवपण वाचला पाहिजे. किती अगतिकता ना? म्हणून जंगलात स्वतः जे सक्षम आहेत तेच टिकू शकतात. आणि त्याचे शिक्षणही ते जन्मताच शिकतात. असे हे नाट्यमय प्रसंग सुरू असताना पुन्हा एकदा दबकत दबकत पाण्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न भेकराने केला. फक्त पाण्याला तोंड लावले, एक घोटदेखील पाणी प्यायले नसेल तर एकाकी दचकून धूम ठोकत पळून गेला. तो परत फिरकलाच नाही. वाटलं किती पाण्यासाठी धडपड, मरमर ही या वन्यजीवांची.

भेकराचा अंदाज अगदीच खरा ठरला. काही वेळातच जंगलाचा राजा रूबाबात पाण्याच्या दिशेने येताना दिसला. काय त्याची चाल, काय त्याचा रूबाबदारपणा, त्याचा आमच्याकडे बघण्याचा अंदाज. अगदी जागेवरूनच दहशत निर्माण करतो तो. एक आनंद, एक उत्सुकता आणि जंगलाचा राजा आपल्या समोर याचा आनंद काही औरच. कितीतरी क्लिक केले आणि कॅमेरा कधी फुल्ल झाला कळलेच नाही. राजे पाण्यात उतरले. अगोदर पाणी प्यायले मनसोक्त. नंतर स्वत:ला पाण्यात सोडून दिले, अंगाची काहिली थंड करण्यासाठी. अगदी निवांत जंगलाच्या राजर्षींचे दर्शन झाले आमचे. वेळ संपत आली म्हणून परत फिरावे लागले.

*****

# झाडे तेथे पक्षी-खिडकीतून पक्षी दर्शन



**बाळासाहेब कुलकर्णी**
मो. ९८२२४६५४१०

सध्याच्या परिस्थितीत घराबाहेर जाता येत नाही. आम्ही राहात असलेल्या इमारतीच्या आसपास, परिसरात अनेक झाडे आहेत. कडुलिंब, औदुंबर, साग, निलगिरी, फणस, आंबा, चिक्कू, नारळ, सुपारी, रायआवळा इत्यादी. सध्या सकाळी, संध्याकाळी घराच्या पूर्वेस व उत्तरेस असलेल्या खिडक्यांमधून बाहेरचा परिसर न्याहाळतो.

कोकिळ पहाटे आवाज करतात. त्यांच्या आवाजाने लवकर जाग येते. मे महिन्याच्या सुरुवातीपासून कावळ्याची एक जोडी वाळलेल्या झाडाच्या फांदीच्या बारीक काटक्या चोचीत पकडून घरटे बनविण्यासाठी नेताना दिसते. नऊ तारखेला सकाळी आठ वाजता एक कोकिळा त्या वाळलेल्या झाडाच्या फांदीवर बसलेली दिसली. बहुधा ती कावळ्याच्या घरट्याच्या मागावर असावी. नंतर जवळच असलेल्या कडुलिंबाच्या फांदीवर स्थिर बसून राहिली. थोड्या वेळाने ती उडून गेली. मात्र कोकिळ घरट्यासाठी काटक्या नेताना दिसत नाहीत. एक पारवा त्या वाळलेल्या झाडाच्या खाली असलेल्या पत्र्यावर पडलेल्या वाळलेल्या छोट्या काटक्या घरटे करण्यासाठी नेताना दिसला.

खिडकीतून बाहेर पाहताना लालबुड्या बुलबुल, शिपाई बुलबुल, नाचरा, पोपट, साळुंकी, रामगंगा, शिंजीर, शिंपी आदी पक्षांचे दर्शन होते. आवाजावरून ही त्यांचं अस्तित्व जाणवतं. आकाशाकडे पाहताना घारीही घिरट्या घालताना दिसतात.

झाडे आणि पक्षी यांचे नाते किती जवळचे आणि अतूट आहे ते आपल्याला अशा निरीक्षणातून दिसून येते. शिकावे ते निसर्गाकडून आणि घ्यावे तेही निसर्गाकडूनच!

# वनस्पती संवर्धनातून पक्षी वैभवाकडे




रेवन योगेश चौधरी
Email id : revanchaudhari2220@gmail.com
8329020726.


निसर्गातील विविध घटकांवर काम करणाऱ्या लोकांना जर तुम्ही निसर्ग संवर्धन म्हणजे काय, असे विचारले तर कदाचित प्रत्येकाचे मत वेगळे असू शकते, पण जर या सगळ्या मतांचा सार काढला तर असं लक्षात येतं की एखाद्या प्रजातीचा अधिवास सुरक्षित केल्यास त्या प्रजातीचे संवर्धन आपोआप होते. उदाहरणार्थ एखाद्या भागामध्ये सामान्यतः जे पक्षी आढळतात त्या ठिकाणी जर आपण मधमाशा आणि फुलपाखरांना आकर्षित करणारी स्थानिक झाडे (nectar and host plants) लावली तर त्या भागातील या किड्यांची संख्या वाढेल आणि त्यामुळे फ्लायकॅचर कुळातील पक्षी तिथे वावर करतील. अजून जर आपण काही स्थानिक झाडे लावली तर या पक्ष्यांसाठी हाईडिंग प्लेस व रेस्टिंग प्लेस तयार होणार. असे करून आपण त्यांना एक नवीन अधिवास तयार करून देऊ. काही वर्षात आपल्या निरीक्षणात असे येते की त्याच अधिवासात या पक्ष्यांनी घरटीसुद्धा करायला सुरुवात केली आहे. यालाच आपण काही अर्थी फूड चेन रिस्टोरेशन पण म्हणू शकतो.

भारतीय वन्यजीवास काही मोठ्या धोक्यांमध्ये एक म्हणजे विदेशी प्रजातीचा स्थानिक प्रजातीवर होणारा दुष्परिणाम आणि त्यामुळे स्थानिक प्रजातींची घटणारी संख्या. झाडांबद्दल बोललो तर गुलमोहर, सुबाभूळ, वेडीवाकडी बाभूळ, उन्दीरमारी, गाजर गवत, कैलास पती, ऑस्ट्रेलियन बदाम, इंग्लिश चिंच, बका नीम, निलगिरी, गुलमोहर, रेन ट्री इत्यादी. या विदेशी वनस्पतींची यादी न संपणारी अशी आहे आणि या वनस्पती आपल्या पर्यावरणासाठी अपायकारक आहेत. असे असतानाही ते मोठ्या प्रमाणावर लागवडीखाली आणले जातात, आणि याच कृतीला बरेच लोक अज्ञानामुळे निसर्ग संवर्धनही म्हणतात. मग सुरू होतो तो वन्यजीवांचा त्या भागातून इतर भागात जायचा प्रवास. यालाच आपण Migration due to lack of Habitat and resources म्हणतो. अशा परिस्थितीत त्या परिसरात सर्वसामान्यपणे आढळणारा एखादी जीव आता बऱ्याच शोध घेतल्यानंतरही दिसत नाही तर मग असे लक्षात येते की त्या जीवाचा आधिवास तेथून नष्ट झाला आहे आणि याला कारण विदेशी वनस्पती आहेत. उदाहरणार्थ तनतनी, घाणेरी, गाजर गवत, उंदीर मारी, कुसळ.

आपण ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, झाडांच्या उत्पत्तीचे कारण फक्त ऑक्सिजन देणे नाही. ऑक्सिजन हे झाडाचे एक बायप्रॉडक्ट आहे. जर ऑक्सिजन देणे हाच झाडांचा मूळ उद्देश असता तर पृथ्वीवरील सर्व ठिकाणी एकाच प्रकारचे झाड दिसले नसते का? मुळात काही विदेशी वनस्पतींवर पक्षी वावरताना दिसतात पण आपण हे लक्षात घेतले पाहिजे की त्यावर फक्त काही पक्षी दिसतात. पक्ष्यांची विविधता नाही.

मग आता अधिवास निर्माण किंवा पुनर्निर्माण यासाठी नेमकं करायचं तरी काय?

ते ठिकाण जंगली भागात असेल तर त्या जागेवरील 'री फॉरेस्टेशन'साठी निसर्गावर अवलंबून राहिलं पाहिजे. तेथे माणसाचा हस्तक्षेप योग्य नाही आणि जर ते स्थान मानवी वस्तीजवळ असेल तर आधी त्या भौगोलिक प्रदेशाचा पूर्ण अभ्यास केला पाहिजे. मग तेथे आढळणाऱ्या लोकल ऋश्रीर । षर्रीपर चाही अभ्यास झाला पाहिजे. मग अधिवास पुनर्निर्माण करताना आपण फक्त तेथे आढळणाऱ्या आणि फक्त स्थानिक वनस्पतींचा वापर केला पाहिजे.

नुकताच मुंबई महानगरपालिकेच्या ट्री ॲथॉरिटीने घेतलेल्या निर्णयानुसार मुंबईमध्ये फक्त स्थानिक झाडांची लागवड होणार आहे. निर्णय पर्यावरण संवर्धनासाठी आदर्श असा निर्णय आहे. इतरही ठिकाणी अशा निर्णयाची अंमलबजावणी गरजेचे आहे. त्यासोबतच Botany, zoology किंवा पर्यावरण शास्त्रात तज्ज्ञ अशा व्यक्तींची नेमणूक झाली पाहिजे. संवर्धित क्षेत्र एवम अभयारण्य वगळल्यास शहरी किंवा निम शहरी भागात असणाऱ्या, fragmented forest and grassland patches वर आपण जास्त लक्ष देऊन त्यांचं पुनरूज्जीवन करून तेथील स्थानिक वन्य जीवांचे अस्तित्व सुरक्षित केले पाहिजे.

*****

# घरपाकोळी पक्ष्यांचे पालकत्व



**अनिल उरटवाड**
मु.पो.ता.जिंतूर, जि.परभणी
aniluratwad@gmail. com
8793558310

कोरोना आला आणि सारं जग थांबलं. निसर्गाला मात्र कोरोनामुळे थोडाही फरक पडला नाही. उलट निसर्गाला याचा उपयोग झाला. या टाळेबंदीच्या काळात प्रदूषण पातळी कमी झाली. मानवाचा हस्तक्षेप पूर्णपणे बंद झालेला. नैसर्गिक संवर्धनाला पूर्णपणे वाव मिळाला. एकमेव निसर्गचक्र आविरतपणे सुरू होतं. निसर्गातील प्रत्येक घटक मोकळा श्वास घेऊ लागला. माणसांनी स्वत:ला पिंजऱ्यात कैद करुन घेतले होते. महानगर, नगरातील वर्दळ कुठंही दिसत नव्हती. हे सर्व एक प्रकारे पर्यावरणासाठी चांगलचं घडत होतं.

कोरोनाचा प्रभाव आता कमी कमी होत चालला होता. माणसं पिंजऱ्यातून बाहेर पडू लागली. स्वत:च्या हव्यासापोटी सर्व काही गिळंकृत करू पाहणारी ही माणसं आपआपल्या कामाला लागली. एका महाविद्यालयात स्वच्छतेच्या नावाखाली 'घरपाकोळी' या पक्ष्यांची संपूर्ण (वस्ती) घरटी तोडून टाकली. ज्ञान मंदिरात जर अशा घटना घडत असतील तर हा प्रकार खूप निंदनीय आहे. महाविद्यालयातील लोकांनी स्थानिक सर्पमित्रांशी संपर्क करून ती पिल्ले सर्पमित्रांच्या स्वाधीन केले. या सर्पमित्रांना पक्ष्यांविषयी जास्त माहिती नसल्याने त्यांनी श्री. गणेश कुरा सरांशी संपर्क करून घडलेली सर्व माहिती दिली. लागलीच वेळ न घालता श्री. कुरा सरांनी ती सर्व पिल्ले जिंतूरपर्यंत पाठवून द्या, असे सांगितले. काही वेळा नंतर सर्पमित्रांनी ती पिल्ले स्वतः काळजीपूर्वक माझ्यापर्यंत जिंतूरला पोहोचवली. बॉक्समध्ये घर पाकोळीची २९ पिल्ले होती. सात पिल्यांनी घटनास्थळीच आपला जीव सोडला होता. एकोणतीस पिलांना जगवण्याची जबाबदारी आता आमच्यावर आली. हा पक्षी प्रामुख्याने हवेत उडत असणारे कीटक खात असतो. याची शिकार करण्याची पद्धत जरा वेगळीच. घर पाकोळी शिकार करताना आपले तोंड उघडे ठेऊन उडत असते. उडते कीटक तोंडात येत असतात. गळ्यात कीटक साठवून ठेऊन शिकार करून झाल्यानंतर एक एक करून घर पाकोळी आपल्या पिलांना भरवत असते. किडे भरवणं हे किती अवघड काम आहे ते किडे पकडते वेळी आमच्या लक्षात आलं. पकडून आणलेले किडे हे पक्षी खातील का नाही? हा आम्हाला पडलेला प्रश्न. पिल्लांना किडे खाऊ घालता वेळेस ती खूप चवीनं ते खात होती. ते पाहून आमचा आनंद गगनात मावेनासा झाला. पिल्लांना जगण्याची आणि जगवण्याची आमची इच्छा आत्ता प्रबळ झाली होती. रोज किडे पकडण्यासाठी रानोमाळ दोन ते तीन किलोमीटर भटकायचं. पकडलेले किडे डब्यामध्ये टाकायचे. एका वेळेला वाटायचं एक जीव वाचवायचा आणि दुसरा घ्यायचा. हे मनाला कुठं तरी पटत नव्हतं. शेवटी पक्षिमित्र म्हटल्यानंतर जड अंतकरणाने ते करावंच लागतं. आणि ते आम्ही खूप आनंदाने केलं. २९ पिल्ले असल्यामुळे त्यांना एकाला भरवणं खूप अवघड जात होतं. त्यामुळे आम्ही २९ पिल्लांना तीन गटात विभागलं. माझ्याकडे (अनिल उरटवाड, पक्षिमित्र) ९ पिल्ले घेतली. पक्षिमित्र गणेश कुरा यांनी १० आणि पक्षिमित्र माणिक पुरी यांनी १० असे विभागून आम्ही पिलांची काळजी घेत होतो. रोज सकाळी किंवा संध्याकाळी माळरानावर जाऊन पिल्लांसाठी किडे पकडणे हा गेली चार दिवस नित्यक्रम झाला होता. आम्ही आनंदाने किडे पकडत होतो. कधी पायात काटा रुते, तर हातांना काटे टोचत असे. एवढं सारं होत असताना या वेदना कधी त्रासदायक वाटल्या नाहीत.

रोज दिवसातून तीन वेळा पिल्लांना दोन ते तीन मोठी कीटक छोटे छोटे तुकडे करून भरवणे सुरु होते. एक दिवस एक पिल्लू मेलं, दुसऱ्या दिवशी एक असे तीन दिवसात तीन पिल्ले मेली. ही पिल्लं का मरत असावीत, यांना वेळेवर खायला मिळत नसेल काय? नैसर्गिकरीत्या भरवणे हे आपल्याला कुठे जमणार. कृत्रिम ते कृत्रिमच. नैसर्गिक गोष्टीला कोणत्याही प्रकारे तोड नाही. ही पिल्ले दुसऱ्या पाकोळी पक्ष्यांच्या घरट्यात सोडण्याचा निर्णय घेतला. शहरातील सहकारी बँकेच्या इमारतीला आणि बस थांब्याच्या इमारतीला अनेक घर पाकोळी पक्ष्यांची घरटी आहेत. जर पिल्ले त्या घरट्यात सोडली तर ती त्या घरटयात जातील का? त्या घरट्यातील पक्षी या पिल्लांना स्वीकारतील का? या सर्व प्रश्नाची उत्तरे मिळाली. एका पिल्ल्याला सहकारी संस्थेच्या इमारतीला असणाऱ्या घरट्यात सोडून पाहिले. पिल्ल्याने घरट्याला अलगद पकडले आणि काही

वेळाच्या आतच पिल्लू घरट्यात जाऊन बसले. थोडा वेळ निरीक्षण केल्यानंतर पिल्याला कुठल्याही प्रकारे धोका जाणवला नाही. आमच्या प्रयत्नाना यश मिळाले.

आता उर्वरित २५ पिल्ले बस थांब्याच्या इमारतीला असणाऱ्या घरट्यात सोडण्याचा निर्णय झाला. एक-एक करत सर्व पिल्ले वेगवेगळ्या घरट्यात आत जाऊन बसू लागली. हे पाहताना आमचा आनंद द्विगुणीत झालेला होता. या सर्व अथक प्रयत्नांना आम्हाला यश प्राप्त झाले आणि आम्ही खऱ्या अर्थाने पक्षी संवर्धन करत आहोत याचा आम्हा प्रत्येकाला मनस्वी अभिमान वाटला.

**मिळुनी सारेजण । करू द्विजगण रक्षण ।।**

या आपल्या महाराष्ट्र पक्षीमित्रच्या बोधवाक्यानुसार पक्षी संवर्धनासाठी कटिबद्ध होऊ या.

*****

# फिरते घर!



**सचिन पंदारे**
बंगळूरू

अद्विका धावतच आली. ''बाबा लवकर या बाल्कनीमध्ये. खूप लांब शेपटी असलेला बर्ड आला आहे.''

मी लगबगीने तिच्या मागे गेलो. तिने आमच्या फ्लॅटच्या लगतच असलेल्या नारळाच्या झाडाच्या शेंड्याकडे बोट दाखवत विचारलं, ''कुठे आहे गं?'' ''त्या तिथे होता तो. आता उडाला असेल.''थोड्याच वेळच भुर्र....

एक छोटासा तपकिरी रंगाचा पक्षी त्या नारळाच्या झाडावर येऊन बसला. त्याच्या चोचीत गवताचं एक हिरवंगार लांब पातं होतं. अद्विका त्यालाच त्याची शेपटी समजून बसली होती.

ही ठिपक्यांची मुनिया. इंग्रजीमध्ये scaly breasted munia म्हणतात. शेपटीसकट अवघी १०-१२ सेमी ची लांबी. डोक्यावर आणि पाठीवर चमकदार तपकिरी रंग. छाती आणि पोटाच्या बाजूला त्याच तपकिरी रंगाचे खवले. शरीराच्या मानाने जाडसर चोच. हलकी मंजुळ अशी चिवचिव. तीही गरज असली तरच. अन्यथा शांत. सुंदर ते ध्यान. वास्तविक पाहता त्या गवताच्या लांब पात्यामुळे तिचं रूप एखाद्या स्वर्गीय नर्तक (bird of paradise) पेक्षा कमी नव्हतं.

जुलै ते ऑगस्ट दरम्यान ती मुनिया आणि तिचा साथीदार घर बनविण्यासाठी दारोदार फिरतात. एखादी सुरक्षित जागा निवडतात आणि आपल्या येणाऱ्या पिल्लांसाठी बिऱ्हाड थाटतात. मग सुरु होते 'ती' जमवाजमव, कुठून एखादी वाळलेली काडीच आण, नाहीतर अशी गवताची पाती. हे सगळं अगदी सुंदर रीतीने रचून ते एक टुमदार घर बनवतात.

ती थोडा वेळ झाडावर बसून इकडे तिकडे कानोसा घेऊन उडाली. आणि आमच्या बाल्कनी च्या बाजूने गायब झाली. कुठे गेली असावी?

''अद्विका, चला आपण कॅमेरानी फोटो काढू, मी टेरेस वर जातो.''

''मी पण येईल माझा कॅमेरा घेऊन.''

''ठीक आहे.''

वर पोहोचल्यावर इथे खूप ऊन आहे. ''तू इथे सावलीत थांब.''

''नाही मी तुमच्या सोबत येते.''

माझ्यासमोरून ती मुनिया आमच्या इमारतीच्या मागच्या बाजूला गेली होती. तिकडे जाऊन बघितलं तर गवसेना कुठे गेली ते. मग मी परत नारळाच्या झाडाकडे आलो. थोडी वाट बघितली. ती परत चोचीत गवत घेऊन तिथेच बसली.

मी थोडे फोटो काढले. मग माझी शोधाशोध सुरू झाली की, ती घरटं बांधते तरी कुठे?

टेरेसच्या पॅरापेट वॉलच्या कडेकडेने बघत बघत मी आमच्या स्वयंपाकघर आणि बाल्कनी याच्या मधल्या भागात पाइप जवळ बघितलं. तिथे भिंतीलगत एक कोपऱ्यात यांनी घरटं बनवलं होतं.

म्हणजे हे जोडपं आता आपल्याला बाल्कनीत रोज हजेरी लावणार. अद्विकाची खूप मजा आहे. तिने लगेच त्यांच्यासाठी एका मातीच्या वाडग्यात पाणी भरून ठेवले. किती काळजी असते मुलांनासुद्धा!

या वर्षी हाच या मुनिया कुटुंबीयांचा पत्ता. आता चाहूल लागली ती त्यांच्या पिल्लांची....

# चक्रवाकाचा रूसवा



**लक्ष्मीकांत नेवे**
8149659353/7588740661
lakshmikant.bird@gmail.com



०२ मार्च २०१७ हा दिवस माझ्या चांगलाच लक्षात राहिला आहे. माझे पक्षिनिरीक्षण भोगावती नदीच्या परिसरात सुरू होते. सकाळी साडेसातला सुरु केलेले पक्षिनिरीक्षण तीन किलोमीटरच्या परिसरात सुमारे अडीच तास चाललेले होते. जाता-येताना एक चक्रवाक लांबवर भोगावती नदीपात्रात एकटाच आढळला. आजूबाजूला बघून खात्री केली; पण जोडीदार दिसला नाही. नदीपात्रातील खडक आणि खड्ड्यातील पाणी यामुळे दुसरा चक्रवाक दृष्टिआड असावा असे वाटले; पण थोड्याच वेळात दुसरा चक्रवाक घिरट्या घालत खाली उतरला. दुर्बिणीने बघितले तर दुसरा चक्रवाक पहिल्याजवळ बसून होता. त्याला धक्के मारतोय की काय असे जाणवत होते. काही वेळ थांबून पहिल्याला तेथेच सोडले आणि उडाला. मग मात्र वाटले काहीतरी गडबड आहे. पहिला चक्रवाक जखमी असावा का? हा प्रश्न घेऊन घरी परतलो. कारण चक्रवाक असलेली जागा बरीच लांबवर होती आणि माझी परतीची वेळ झाली होती. सोबतच्या मित्रासह ती जागा लक्षात ठेवून पुन्हा बघण्याचे ठरविले.

पण चक्रवाक डोक्यातून काही जाईना. जेवण आटोपून दुपारच्या ड्युटीवर जायचे होते. ड्युटीवर गेल्यावरही चक्रवाक काही पिच्छा सोडेना. त्या चक्रवाकाची जागा भुसावळ औष्णिक केंद्र, दीपनगरच्या कोळसा हाताळणी विभागामागे असलेल्या भोगावती नदीच्या पात्रात होती. त्यामुळे ती जागा शोधण्यासाठी अंदाजाने पोहचलो आणि पाच-सहा तासानंतरही तो चक्रवाक त्याच जागेवर होता. मग मात्र हुरहूर वाढली. सूर्य मावळतीकडे सरकला होता. चक्रवाक संकटात असावा का? अश्या जागेवर पोहचणेही कठीणच होते. मनात विचारांचे काहूर माजले होते.


तेवढ्यात सकाळचेच दृश्य पुन्हा दिसले. दुसरा चक्रवाक लांबून उडत आला. घिरट्या घालून उतरला आणि त्याने नदीपात्रातील चक्रवाकाला अक्षरक्ष: दणके मारायला सुरुवात केली. मात्र उपयोग होत नव्हता. दुसऱ्याने पुन्हा उड्डाण घेतले, घिरट्या मारल्या आणि पुन्हा खाली उतरून धक्के मारले. हा प्रकार तीन वेळेस माझ्यासमोरच झाला. दिवसभरात किती वेळेस हा प्रयत्न झाला असेल कोणास ठाऊक? दुसऱ्या चक्रवाकाच्या वागण्यात साऱ्याच भावना प्रेम, राग, चीड, हुरहुर अनुभवता येत होती. माझ्याजवळ हा सारा प्रकार उंच जागेवरून तटस्थपणे पाहण्याशिवाय पर्यायच नव्हता. मित्राला कळविले की, उद्या सकाळी कोणत्याही परिस्थितीत त्या अवघड जागेवर जाऊच.

तेवढ्यात दुसऱ्या चक्रवाकाने पुन्हा उड्डाण केले. आता तो माझ्या नजरेच्या टप्प्यात समोर उडत होता. मला वाटले पुन्हा गिरकी घेऊन उतरेल. पण नाही, हा लांबवर तापी नदीकडे निघून गेला. आता मात्र मी भयंकर निराश झालो. सूर्य क्षितिजावर झळकत होता. सूर्याकडे बघतच विचार करत होतो. सूर्यापुढेच मला तीन चक्रवाक येत असताना दिसले. मी कमालीचा आश्चर्यचकित झालो. दुसरा चक्रवाक पुढे आणि एक जोडी मागे असे तिघेही भोगावती नदीपात्राकडे आले होते. पाहुण्या जोडीला जागा माहीत नसल्याने ती घिरट्या घालू लागली. दुसरा चक्रवाक खाली उतरला. पहिल्याच्या अगदी जवळ जाऊन उडाला. जणू त्याने नवीन जोडीला नदीपात्रातील चक्रवाकाची जागाच दाखविली. यानंतरचे काम जोडीचे होते. चक्रवाकाची आलेली पाहुणी जोडी घिरट्या घेत नदीपात्रातील चक्रवाकाजवळ उतरली. तिघांमध्ये काय हितगूज झाले कोणास ठाऊक? जोडीनेही त्याला धक्के मारले; पण ते आधीपेक्षा सौम्य असावेत. यानंतर मात्र सकाळपासून एकाच जागेवर बसलेल्या चक्रवाकाने उड्डाण घेतले आणि वर घिरट्या घालत असलेल्या आपल्या जोडीदारासह ते तापीपात्राकडे वळले. नवीन आलेली जोडीही त्यांच्यामागेच उडत होती. चारही चक्रवाक मावळलेल्या सूर्याच्या दिशेने संधीप्रकाशात लुप्त झाले.मी मात्र आश्चर्याने म्हणलो, 'अरे हे काय? हा तर ना आजारी ना अडकलेला, हा तर रूसलेला होता.' अश्या रीतीने नवरा-बायकोचे भांडण दुसऱ्या जोडीने सोडविले आणि चक्रवाकचा रूसवा संपला.

# पुस्तक परिचय
## पक्षिगाथा-पक्ष्यांची वाचनीय उकल



दिलीप विरखडे
वर्धा
7775883861




'मी आहे तरी कोण?'. या प्रश्नाच्या शोधात मी कधी जाईन, असे वाटत नाही; पण पक्षी आहे तरी कोण? हा प्रश्न मात्र मला सदैव पडतो. हा आणि पक्ष्यांच्या अनुषंगाने तत्सम अनेक प्रश्नांच्या शोधात मी कायम असतो. ही शोधाशोध करीत असताना 'पक्षिगाथा' हे पुस्तक हाती लागलं आणि त्यातील नेमकेपणाने दिलेल्या उत्तरामुळे, हे पुस्तक मला आवडून गेलं. दिगंबर गाडगीळ हे पक्षिगाथाचे लेखक. गाडगीळ सरांना मी अद्याप भेटलो नाही. पण दर तीन महिन्यांनी न चुकता 'त्यांना' वाचण्याचा योग येतो, तो महाराष्ट्र पक्षिमित्रच्या अंकामुळे. गाडगीळ सर त्याचे संपादक आहेत. पक्षिमित्रांची चळवळ आणि त्यांची नित्यनेमाने होणारी संमेलने, हे महाराष्ट्राचे एक वैशिष्ट्य. या चळवळीची पायाभरणी ज्यांनी ज्यांनी केली त्या अग्रणित दिगंबर गाडगीळ येतात. ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ, पक्षिलेखक आणि चळवळीशी संबंधित असलेल्या गाडगीळांचे संपादकीय मी आवर्जून वाचतो. त्यांनी केलेल्या सूचनांशी मी सहमत असतो. 'देशोदेशींचे राजपक्षी' हे त्यांचं एक पुस्तक माझ्या संग्रही आहे. काही निवडक राष्ट्रांमधील राजपक्ष्यांची अभिनव पद्धतीने ओळख त्यांनी त्यात करून दिलेली आहे.

पक्षी आहे तरी कोण? आणि त्याला जोडूनच पक्षी जन्माच्या इतिहासापासून पक्षिगाथा ग्रंथाचा प्रारंभ होतो. पक्षी माणसाच्या कितीतरी आधी म्हणजे वीस कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर आले तर माणूस दीड कोटी वर्षांपूर्वी विकसित होऊ लागला. पक्ष्यांची जीवनशैली वेगळी, नाजूक शरीर रचना व ठिसूळ हाडे असल्यामुळे प्राचीन पक्ष्यांचे अवशेष मिळणे कठीण आहे. आर्किऑप्टेरिक्सच्या सापडलेल्या जीवाश्मावरून आदी पक्ष्यांबाबत उलगडा होतो. सरपटणाऱ्या प्राण्यांचा एक छोटा गट ते आर्किऑप्टेरिक्स ही साखळी आणि पुढे त्यात झालेले बदल येतात. सुमारे दोन दशलक्ष वर्षांपूर्वीचा काळ हा पक्षिजातीच्या भरभराटीचा काळ मानला जातो. या काळात सुमारे ११ हजार ६०० पक्ष्यांच्या जाती अस्तित्वात असाव्यात, हे लेखक नमूद करतो. पक्ष्यांची शरीररचना, पक्षिचोचीचे वैविध्य, पक्ष्यांचे पाय व बोटे, पक्ष्यांची पिसे याबाबत नेमकी आणि महत्त्वाची माहिती आपल्याला मिळते. पक्ष्यांचे रंग या प्रकरणात रंगाबाबत विस्ताराने लिहिले आहे. अनाकर्षक रंग, भडक रंग, गडद रंग, रंगरेषा आणि ठिपके या मागे असलेले उद्देश लेखक सांगतो. पिसांमधील रंगद्रव्य नसल्यास पक्षी पांढरे दिसणे (Albinism), या उलट सर्वांग गडद दिसणे (Melanism), पक्षी फिक्कट दिसणे (Leucism), पक्षी पिवळे दिसू लागणे (Xanthochrism) इ. रंगाचे हेदेखील प्रकार आलेले आहेत. यातील Albinism हा प्रकार मला माहीत होता, उर्वरित तीन प्रकारांची या प्रकरणामुळे ओळख झाली.

पक्ष्यांची बुद्धिमत्ता आणि त्याला जोडूनच पक्ष्यांमधील सहसंवेदना हे छोटेखानी प्रकरण आहे. इंग्रजी भाषेत बावळट माणसाला 'पक्षिबुद्धीचा' (Bird Brained) म्हणून संबोधले जाते, पण हे पक्ष्यांना अन्यायकारक आहे असे सांगून लेखक पक्ष्यांचे अन्नशोधाचे कौशल्य, त्यांचे हजारो किलोमीटर अंतरावरचे अचूक स्थलांतर, याबाबत अनेक उदाहरणे देतो. जगभरातले कावळे तसे हुशारच पण जपानमधील कावळे रहदारीचा उपयोग करून घेतात. दिवे लाल असताना चक्क तिथे अक्रोड टाकतात. हिरवे दिवे लागले की रहदारी सुरू होऊन अक्रोड फुटतात. पुन्हा दिवे लाल झाले की तुकडे गोळा करतात. यावरून कावळ्यांची निरीक्षणक्षमता लक्षात येते. अन्नशोधासाठी बाह्य साधनांचा उपयोग करणारे देखील पक्षी आहेत. अन्न प्राप्त करण्याचे कौशल्य पक्ष्यांजवळ असले तरी मनुष्यप्राण्यांजवळ ज्या भावभावना आहेत, त्या भावना पक्षी बाळगतात असे मात्र म्हणता येणार नाही. पण याबाबत शास्त्रज्ञांचे दोन गट भिन्न मते व्यक्त करतात. एकाच्या मते पक्ष्यांचे बागडणे, शिकार करायला शिकणे हे तांत्रिक तर दुसऱ्या गटाच्या मते पक्ष्यांना आपल्यासारख्या नाहीत, पण भावना आहेत; ज्यांचा उगम त्यांच्या जैवशास्त्रीय घडणीत आहे असे लेखक लिहितो.

पक्ष्यांचे स्थलांतर हे एक विस्तृत प्रकरण यात आलेले आहे.

सगळे पक्षी स्थलांतर करतात असे नाही. अंदाजे चार हजार जातीचे पक्षी म्हणजे एकंदर पक्षिजातीच्या ४० टक्के जाती स्थलांतर करतात. एका जातीचे सर्व पक्षी स्थलांतर करतात असेही नाही, काही जातींच्या पक्ष्यांतील काही समूहच स्थलांतर करतात. त्यानंतर स्थलांतराचे प्रकार-एक दिशेप्रमाणे, दुसरे काळाप्रमाणे, परत त्याचे उपप्रकार, स्थलांतर करतानाची उंची, त्यावेळेस पक्ष्यांचा वेग उदाहरणांसहित दिलेले आहेत. स्थलांतरितांच्या वाटेतील अडथळे व धोके सांगून शास्त्रज्ञांच्या अंदाजाप्रमाणे १०% पक्षी तरी आपल्या इच्छित स्थळी न पोहोचता वाटेवरच प्राण सोडतात. त्यावर जगभरात करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा थोडक्यात उल्लेख येतो. पक्ष्यांचे स्थलांतर हा तसा गुंतागुंतीचा विषय आहे. त्याचे गूढ अद्याप संपूर्णपणे उलगडलेले नाही, असे नोंदवतो आणि स्थलांतराच्या अभ्यासाची सुरुवात कशी झाली ते सांगतो. ती मुळातूनच वाचण्यासारखी आहे.

जगभरात पक्ष्यांबद्दल अनेक अंधश्रद्धा आणि गैरसमज आहेत. भारतातील गैरसमजुतींची इथे उजळणी होते आणि पाश्चात्त्य देशातील अंधश्रद्धांबद्दल नवीनच माहिती मिळते. यातील एक उदाहरण इथे देतो. लंडनच्या टॉवरवर जोपर्यंत 'रॅवनपक्षी' आहे तोपर्यंत ब्रिटनचे राजघराणे अबाधित आहे. टॉवरवर रॅवन पक्षी कायम राहतील यासाठी तशी व्यवस्था तर केलेली आहेच पण रक्षकसुद्धा नेमलेले आहेत! तिथे ठेवलेल्या पक्ष्यांचे पंख कातरून ठेवले जातात. हे वाचून आश्चर्याने आपली बुबुळे घुबडांसारखी मोठी होतात. त्याही पुढे लेखक लिहितो दुसऱ्या महायुद्धात बॉम्बच्या आवाजाच्या धक्क्याने रॅवन मृत झाले होते तेव्हा नवीन पक्षी आणून ठेवेपर्यंत तो टॉवर प्रेक्षकांना बंद ठेवला होता!! पक्षिप्रेमी, पक्षिनिरीक्षक आणि पक्ष्यांच्या अभ्यासाकरिता जगभर झपाटलेली माणसे सापडतात. वयाच्या ८१व्या वर्षी जगातील सर्वाधिक पक्षिनिरीक्षक होण्याचा मान टॉम गुलिक या ब्रिटिश नाविक दलातील अधिकाऱ्याकडे जातो. ९०४७ व्या पक्ष्याची नोंद करून ते 'महापक्षिनिरीक्षक' ठरले तर पक्ष्यांसाठी पृथ्वीची प्रदक्षिणा घालणाऱ्या दोघांची माहिती यात येते. अशी सगळी रंजक माहिती पानापानांवर विखुरलेली आहे. इतर अनेक पक्षिविषयक प्रश्नांची उकल यात केलेली आहे.

'पक्षिगाथा' हे केवळ माहितीचं संकलन नसून लेखकाचा त्या विषयाचा व्यासंग यात दिसून येतो. पक्ष्यांची शास्त्रीय माहिती देणारी बहुसंख्य पुस्तके इंग्रजी भाषेतून आणि माझ्यासारख्याला क्लिष्ट स्वरूपाची वाटणारी आहेत. पक्ष्यांची शास्त्रीय माहिती मराठीतून देणारी पुस्तकेदेखील अगदीच कमी आहे. त्यामुळे पक्षिगाथेचं महत्त्व अधोरेखित होतं. शास्त्रीय माहिती कुठेही बोजड होऊ न देता लेखकाने ती वाचनीय केलेली आहे. पक्षिविश्वाचा अभ्यास करणाऱ्या अनेकांना, त्यांना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे यात मिळतील. या सुंदर आणि माहितीपूर्ण पुस्तकाबद्दल मी लेखकाचे अभिनंदन करतो.

*****

## स्वागत नवीन सभासदांचे

(दि.१ एप्रिल २०२१ ते ३० जून २०२१)

| क्र | नाव | गाव | फोन न. | ई.मेल |
|---|---|---|---|---|
| १२७८ | डॉ. अरविंद भीमराव चव्हाण | नांदेड | 9420775527 | drarvindchavhan@gmail.com |
| १२७९ | श्री विशाल संपत काटकर | सातारा | 8308380288 | vishalkatkar836@gmail.com |
| १२८० | डॉ. प्रविणकुमार शि. चव्हाण | सातारा | 9822347137 | praveendoceagleseys@gmail.com |
| १२८१ | सौ. तेजश्री दीपक जावळे | पुणे | 9970565569 | tejashrijawale@gmail.com |
| १२८२ | कु. मृणाली क. राउत | भंडारा | 8698361513 | mruraut19@gmail.com |
| १२८३ | कु. सांदिपनी एच. मकेश्वर | अमरावती | 7057099692 | sandipanimakeshwar@gmail.com |
| १२८४ | श्री. संजय भारत पवार | नाशिक | 9158886696 | soham.pawar07@gmail.com |
| १२८५ | श्री. मनीष सुरेश सूचक | चंद्रपूर | 9834783661 | manishsuchak1977@gmail.com |
| १२८६ | श्री. रीशिकेश ईश्वरलाल लांडे | अहमदनगर | 7972951307 | rishi.lande@gmail.com |
| १२८७ | श्री. भूषण सुभाष पाठे | भुसावळ | 9766754881 | bsp29bsl@gmail.com |

# महाराष्ट्रातील पक्षी स्थलांतर



डॉ. राजू कसंबे
सहायक संचालक-शिक्षण,
बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई.
मोबाइल: ९००४९२४७३१.

आपल्याला नेहेमी वाटत असलेले कुतूहल म्हणजे महाराष्ट्रात स्थलांतर करून येणारे पक्षी नेमके कुठून स्थलांतर करून येतात किंवा इथून ते कुठे स्थलांतर करून जातात? ह्या प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात जरी देता आले नाही तरी आपण असे म्हणू शकतो की विविध पक्षी प्रजातींचा स्थलांतर मार्ग आणि येण्याची जागा वेगवेगळी असू शकते. त्यामुळे सगळे स्थलांतरित पक्षी सायबेरिया वरून येतात असे म्हणणे योग्य ठरणार नाही. जसजसे ह्या क्षेत्रात संशोधन होत आहे त्याप्रमाणे हळूहळू आपल्याला पक्षी स्थलांतराची माहिती उपलब्ध होत आहे.

भारतात पक्षी स्थलांतराचा अभ्यास करणारी अग्रगण्य संस्था म्हणजे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई (बीएनएचएस) ही होय. माझ्या सुदैवाने मीसुद्धा गेल्या अकरा वर्षांपासून बीएनएचएस मध्येच काम करतोय.बीएनएचएस द्वारा २०१८ साली प्रकाशित केल्या गेलेल्या इंडियन बर्ड मायग्रेशन अॅटलस (लेखक: डॉ. एस. बालाचंद्रन, तूहिना कट्टी व डॉ. रणजीत मनकदन) ह्या उत्कृष्ट शास्त्रीय ग्रंथात भारतातील पक्षी स्थलांतराची उपलब्ध असलेली अद्ययावत माहिती संकलित करून सादर केलेली आहे. सोबत त्यांचे सरळ रेषेतील स्थलांतर मार्ग दाखविणारा नकाशा सुद्धा दिलेला आहे.

पण अशीच माहिती केवळ महाराष्ट्र राज्यापुरती मला मिळाली नाही. बीएनएचएस द्वारा नांदूर मधमेश्वर पक्षी अभयारण्यात पक्ष्यांच्या पायात वाळे (रिंग) लावून अभ्यास केल्याची माहिती उपलब्ध आहे. तसेच गेल्या काही वर्षांपासून बीएनएचएस ही संस्था मुंबई परिसरात फार मोठ्या प्रमाणावर पक्षी स्थलांतराचा अभ्यास करतेय. मागील वर्षापर्यंत जवळपास दहा हजार पक्ष्यांना वाळे घालण्यात आले अथवा पायात झेंडे (फ्लॅग) बसविण्यात आले आहेत. यापैकी अनेक पक्षी दुसरीकडे कुठेतरी स्थलांतर करून गेल्याची माहिती हळूहळू उपलब्ध होते आहे. २०१४ मध्ये पुण्यातील इला फाउंडेशन द्वारा पक्षी स्थलांतराचा अभ्यास करण्यासाठी ५२ पक्ष्यांना टॅग केले होते. त्यांपैकी भादलवाडी (ता. इंदापूर, जि. पुणे) येथे पंखावर क्रमांक घातलेली पट्टी (विंग टॅग) लावलेला एक राखी बगळा (ग्रे हेरॉन) चार वर्षांनंतर मार्च २०१८ मध्ये २०७ किमी दूर संगमनेर (जि. अहमदनगर) येथे आढळून आला.

या लेखात महाराष्ट्रात स्थलांतर करून येणाऱ्या राजहंस, कलहंस, काळा करकोचा, छोटा तुरेवाला सूरय, मोठा जलरंक, मोठा रोहित व धूसर सूरय या प्रजातींच्या स्थलांतराची अद्ययावत माहिती सादर केलेली आहे. बरेचदा अशी माहिती केवळ संशोधन पत्रांमध्ये सीमित राहते आणि सर्वांना ती सहजी उपलब्ध होत नाही.ही माहिती लेखात उल्लेख केलेल्या अनेक पक्षिमित्रांनी तसेच मी स्वतः प्रकाशित केलेल्या अनेक संशोधन पत्रांमधून घेतलेली आहे.

### मंगोलिया ते महाराष्ट्र : राजहंस (बार-हेडेड गूज)

१३ डिसेंबर २००७ रोजी नागपूरचा पक्षी अभ्यासक आदित्य जोशी, सुशांत भुसारी व मला नागपूरजवळच्या पारडगाव तलावावर गळ्यात पिवळी कॉलर लावलेला राजहंस दिसला. आशीष भोपळे ह्या माझ्या मित्राकडे असलेल्या टेलिस्कोपमधून त्या कॉलरवर इंग्रजीत कोरलेले छण हे शब्द आम्ही वाचले. त्यानंतर पुण्याजवळच्या वीर धरणावर १३ जानेवारी २००८ रोजी पक्षी अभ्यासक आदेश शिवकर ह्यांना असाच राजहंस दिसला. त्याच्या गळ्यातील कॉलरवर इंग्रजीत उ६ असे कोरलेले होते. मी ह्याच्या स्थलांतराची माहिती मिळविण्यासाठी मंगोलिया येथील वाइल्ड लाइफ कंझर्वेशन सोसायटीचे पक्षिशास्त्रज्ञ डॉ. मार्टिन गिल्बर्ट ह्यांना ईमेल पाठविला. त्यांनी कळविलेल्या माहितीवरून आम्हाला राजहंसांच्या स्थलांतराची माहिती मिळाली. त्यांनी ह्या (उ६) राजहंसाला १८ जुलै २००७ रोजी उत्तर मंगोलियामधील दारखड व्हॅली येथे पकडून त्याच्या गळ्यात ही लवचिक प्लॅस्टिकची कॉलर बसविली होती.

गूगल अर्थ ह्या संकेतस्थळावरील नकाशाच्या मदतीने आम्ही दारखड ते पारडगाव हे सरळ रेषेतील अंतर काढले असता ३,८१७ किलोमीटर एवढे असून दारखड ते वीर धरण हे अंतर ४,३२७ किमी एवढे आहे.मंगोलियामध्ये वीण करणारे राजहंस भारतात स्थलांतर करून येतात ह्याचा हा पहिला शास्त्रीय पुरावा होता.

यातील एक राजहंस पुढील किमान चार वर्षे(२०१२ पर्यंत) त्याच्या थव्यासोबत पारडगावच्या तलावावर येत राहिला आणि वृत्तपत्रांमध्ये गाजत राहिला. डॉ. अनिल पिंपळापुरे, श्री. गोपाळ ठोसर, स्व. तरुण बालपांडे, अविनाश लोंढे असे आम्ही त्याचा मागोवा घेत राहिलो. नागपूरचे पक्षिमित्र सुरेंद्र अग्निहोत्री यांना असे आणखी दोन राजहंस आढळून आले. अर्थात तेसुद्धा मंगोलिया येथूनच स्थलांतर करून आल्याचे सिद्ध झाले.

दि. ७ मार्च २०१० रोजी डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांना उजनी

जलायशयावर (पुणे – सोलापूर) एका पायात G95 क्रमांक कोरलेली हिरवी रिंग असलेला राजहंस आढळून आला. डॉ. न्याम्बायर बातबायर (प्रेमाने नुसतेच न्याम्बा) ह्यांनी राजहंस पक्ष्याच्या पायात ही रिंग दि. २९ जुलै २००९ रोजी (सात महिन्यापूर्वी) मंगोलियामधील दिद उलान सरोवर येथे घातली होती. विशेष म्हणजे ह्या राजहंसासोबत अ‍ॅल्युमिनियमचा वाळा घातलेले आणखी दोन राजहंस सुद्धा होते. पण जोपर्यंत त्या वाळ्यावरील क्रमांक कळत नाही तोपर्यंत आपल्याला त्यांच्या स्थलांतराची खात्रीलायक माहिती मिळवता येणार नाही.

दि. १ जानेवारी २०१५ रोजी परत पुण्याजवळील वीर धरणावर पक्षिमित्र स्वप्नील गिराडे ह्याला गळ्यात ठढ असा क्रमांक घातलेली नारिंगी कॉलर असलेल्या राजहंस आढळून आला. ह्या राजहंसाला मंगोलियाच्या बुलगान प्रांतातल्या शारगा (नूर) सरोवरात दि. १५ जुलै २००९ रोजी पकडून कॉलर करण्यात आले होते. तेथील डॉ. मार्टिन गिल्बर्ट हे संशोधन करीत होते. हा राजहंस पाच वर्षांनंतर पहिल्यांदाच कुणाला दिसला होता. आपल्या दृष्टीने महाराष्ट्रात स्थलांतर करून येणारे राजहंस मंगोलिया येथूनच येतात, असे एक अनुमान वरील सर्व नोंदींवरून सहज काढता येईल.

त्यानंतर मंगोलियन पक्षितज्ज्ञांनी अनेक संशोधन पत्रे लिहून ही सगळी माहिती जगासमोर मांडली. त्यात राजहंस पक्षी हिमालयाच्या उंच शिखरांवरून (अधिकृतपणे नोंद ६,५४० मीटर अर्थात २१,४६० फुटावरून) भरारी घेऊन भारतात येतात असेसुद्धा आढळून आले आहे. बीएनएचएसच्या पक्षितज्ज्ञांनीसुद्धा मग राजहंसांच्या पाठीवर ट्रान्समीटर बसवून अधिक संशोधन केले.

**मंगोलिया ते गोंदिया : कलहंस (ग्रेलॅग गूज)**

दि. २१ जानेवारी २०२१ रोजी पक्षिमित्र मुकुंद धुर्वेसर आणि संदीप गभणे ह्यांना गोंदिया जिल्ह्यातील परसवाडा तलावावर गळ्यात सॅटेलाइट ट्रान्समीटर लावलेला पक्षी दिसला. संदीप गभणे यांनी काढलेली छायाचित्रे व माहिती मंगोलिया येथील प्रसिद्ध पक्षितज्ज्ञ डॉ. न्याम्बा ह्यांना कळविली असता हे सॅटलाइट ट्रान्समीटर पश्चिम मंगोलियामधील आयरग सरोवरावर त्यांनीच जुलै २०१९ बसविल्याचे कळले. आयरग पासून परसवाडा हे गूगलअर्थच्या नकाशावर सरळ रेषेत जर जोडले तर ३,२५१ किलोमीटर एवढे अंतर आहे!

रशिया ते अमरावती: काळा करकोचा (ब्लॅक स्टॉर्क)

१० मार्च २०१३ रोजी अमरावती जिल्ह्यातील बासलापूर तलावावर तरुण पक्षिमित्र अशहर खानला (प्रेमाने कृष्णा खान) पायात रंगीत वाळा (पांढरा) असलेला काळा करकोचा (ब्लॅक स्टॉर्क) आढळून आला. त्याने घेतलेल्या छायाचित्रात त्यावरचा कोरलेला ६०५थ हा क्रमांक सुस्पष्ट दिसत होता. ह्या पक्ष्याची माहिती मिळविली असता रशियामधील नोव्होसीबिर्स्क जवळील सुझून येथे डॉ. फ्रांतीसेक पोयर ह्यांनी २१ जुलै २००२ रोजी ह्या पक्ष्याला पकडले होते. झेक प्रजासत्ताकात त्यावेळी रंगीत वाळे टाकून काळ्या करकोच्यांच्या स्थलांतराचा अभ्यास सुरू होता. म्हणजे हा करकोचा तब्बल १० वर्षे२३५ दिवसांनी दिसला होता. सुझून ते बासलापूर सरळ रेषेतील अंतर ३,६८४ किलोमीटर एवढे आहे. दरवर्षी जर हा पक्षी बासलापूर (किंवा अमरावतीला) येथे येऊन परत गेला असेल असे गृहीत धरले तर त्याने त्याच्या आयुष्यात आतापर्यंत किमान ७३,६८० किलोमीटर प्रवास निश्चितच केला असणार असे अनुमान काढता येते! खरे म्हणजे काळे करकोचे किंवा इतर अनेक स्थलांतरित पक्षी साधारणतः सरळ रेषेत प्रवास करीत नाहीत. तसेच ते प्रवासादरम्यान व हिवाळ्यात एकाच ठिकाणाऐवजी आजुबाजूच्या अनेक अधिवासांचा उदरभरणासाठी फायदा उचलतात.

**पर्शियाचे आखात ते पश्चिम किनारा :**

**छोटा तुरेवाला सुरय (लेसर क्रेस्टेड टर्न)**

दि. ३१ डिसेंबर २००९ रोजी अर्नाळा समुद्र किनाऱ्यावर डी. पी. बॅनर्जी ह्यांना एक मृत छोटा तुरेवाला सुरय मिळाला. त्याच्या पायात Inform British Museum London, SW-DD08695 असे कोरलेला अ‍ॅल्युमिनियमचा वाळा घातलेला होता. ह्या पक्ष्याला २७ जून २००८ रोजी कतार आणि बहारिन जवळच्या जारीम ह्या समुद्री बेटावर वाळा घालण्यात आला होता. जारीम ते अर्नाळा थेट अंतर २,४२८ किलोमीटर एवढे आहे.

दि. ११ नोव्हेंबर २०१० रोजी सिंधुदुर्ग येथे प्रसिद्ध पक्षिमित्र भाऊ काटदरे आणि विनोद पाटील ह्यांना पायात वाळा घातलेला मृत छोटा तुरेवाला सुरय मिळाला. त्याच्या पायातील वाळ्यावर ENVIRONMENT TEHRAN DH2377 असे कोरलेले होते. तेहरान येथील पक्षितज्ज्ञ हमीद अमिनी ह्यांनी कळविले की, या पक्ष्याला १६ जुलै २००६ रोजी त्यांनी इराणमधील नाखिलू बेटावर वाळा घातला होता.

आणखी एक छोटा तुरेवाला सुरय दि. ९ जानेवारी २०१० रोजी अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यावर पक्षिमित्र डॉ. वैभव देशमुख ह्यांना मिळाला होता. त्याच्या पायातील वाळयावर ENVIRONMENT TEHRAN DW07196 असे कोरलेले होते. ह्या पक्ष्यालासुद्धा पक्षितज्ज्ञ हमीद अमिनी ह्यांनीच ९ ऑगस्ट २००९ रोजी इराणमधील नाखिलू बेटावर वाळा घातला होता.

ह्या तिन्ही सुरय पक्ष्यांना ते घरट्यात पिल्लू अवस्थेत असतानाच (म्हणजे

उडता येण्यापूर्वी) पकडून पायात वाळे टाकण्यात आले होते.तिन्ही सुरय महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यावर मरण पावले. अर्नाळ्याचा सुरय एक वर्ष सात महिने, सिंधुदुर्गचा चार वर्षेतीन महिने तर अलिबागचा सुरय केवळ पाच महिने जगला होता. वाळा टाकण्याच्या स्थळापासून तर तो पक्षी परत मिळालेल्या दोन ठिकाणांमधील सरळ रेषेतील अंतर काढले असता अनुक्रमे २,४२८ किमी, २,५९९ किमी आणि २,४०० किमी असल्याचे आढळून आले. हे सुरय पक्षी पर्शियाच्या आखातातील बेटांवर वीण करतात. वीण संपल्यानंतर आपल्या समुद्री जीवनाच्या प्रवासाला निघतात. त्यातील बरेच पक्षी मग भारताच्या समुद्र किनाऱ्यावर विणीबाहेरील काळ व्यतीत करण्यासाठी येतात. अर्थात त्यामध्ये मृत्युदर नक्कीच जास्त असतो. मी स्वतः अलिबागच्या आक्षी समुद्रकिनाऱ्यावर पायात वाळा असलेले किमान तीन छोटे तुरेवाले सुरय छायाबद्ध केले आहेत. पण वाळ्यावरील क्रमांक जोपर्यंत वाचला जात नाही तोपर्यंत त्यांच्या स्थलांतराची निश्चित माहिती उपलब्ध होऊ शकत नाही.

### चीन ते चिंचणी – नॉट आऊट आणि यालूजियांग ते अलिबाग : मोठा जलरंक (ग्रेट नॉट)

दि. १८ ऑगस्ट २०१६ रोजी चिंचणीच्या (ता. डहाणू, जि. पालघर) समुद्र किनाऱ्यावर पक्षिमित्र आशिष बाबरे ह्यांना उजव्या पायात झेंडा (फ्लॅग) असलेला एक मोठा जलरंक (ग्रेट नॉट) आढळून आला. छायाचित्रे काढली असता दोन झेंडे असून वरील झेंडा काळा व खालील झेंडा पांढरा असल्याचे स्पष्ट झाले. तसेच पक्ष्याच्या डाव्या पायात वाळा सुद्धा घातलेला होता. प्रत्येक देशातील पक्ष्यांना पायात झेंडे लावण्याची नियमावली (प्रोटोकॉल) आहे. ती बघितल्यास हा पक्षी पूर्व चीनमध्ये चिन्हांकित करण्यात आला असे समजले. संपर्क केला असता चीनमधील नॅशनल बर्ड बँडिंग सेंटरच्या श्रीमती चेन लिक्सिया ह्यांनी माहिती पाठविली. ह्या पक्ष्याला डॉ. मा ह्यांच्या चमूने २००६ नंतर कधीतरी चोंगमीन दोंगतान नेचर रिझर्व, शांघाय अर्थात यांगत्झे नदीच्या मुखाशी पकडून चिन्हांकित केले होते. चीन ते चिंचणी नॉट आऊट अशा ह्या प्रवासाचे सरळ रेषेतील अंतर ५,०७२ किमी एवढे प्रचंड आहे.

दि. ८ नोवेंबर २०२० रोजी पक्षिमित्र अविनाश भगतला अलिबाग (जि. रायगड) जवळच्या आक्षि समुद्र किनाऱ्यावर उजव्या पायात दोन रंगीत झेंडे असलेला मोठा जलरंक आढळून आला. हाच पक्षी मला व चि. वेदांतला दि. २२ व २३ डिसेंबर रोजीसुद्धा तेथेच आढळून आला. वरील झेंडा हिरवा तर खालील झेंडा नारिंगी होता. डाव्या पायात ॲल्युमिनियमचा वाळा होता.ह्या पक्ष्याला चीनच्या पक्षितज्ञांनी यालूजियांग (लिवनिंग प्रांत) ह्या चीनच्या पूर्व किनाऱ्यावरील पाणथळ जागी दि. २६ ऑगस्ट २०२० रोजी चिन्हांकित केले होते. म्हणजे केवळ ७५ दिवसांनी तो इथे दिसून आला. यालूजियांग ते अलिबाग सरळ रेषेतील अंतर ५,४२५ किमी एवढे आहे. त्यानंतरही हा पक्षी अनेक दिवस इथे मुक्कामी होता.

### रोहितची राजस्थान वारी – मुंबई ते चेन्नई आणि राजस्थान : (ग्रेटर फ्लेमिंगो)

दि. ३ एप्रिल २०२१ रोजी जगदीशन नावाच्या पक्षिमित्राला चेन्नईच्या (तामिळनाडू) पल्लीकरणी पाणथळीवर 4AP क्रमांकाचा रंगीत वाळा टाकलेला मोठा रोहित आढळून आला. हाच रोहित जुलै २०२० मध्ये तामिळनाडूच्या शोलिंगानल्लूर पाणथळीवर आढळला होता.ह्या पक्ष्याला दि. २४ ऑक्टोबर २०१८ ला बीएनएचएसद्वारा पाणजेच्या (नवी मुंबई, महाराष्ट्र) पाणथळीवर पायात रंगीत वाळा घालण्यात आला होता. नवी मुंबई येथेच बीएनएचएस द्वारा पायात रंगीत वाळा घातलेला आणखी एक मोठा रोहित राजस्थानच्या सांभरच्या खाऱ्या सरोवरात मेलेला आढळला.

### सेशेल्स ते वसई – समुद्रावरील मुशाफिरी: धूसर सुरय (सूटी टर्न)

दि. २७ जुलै २०२० रोजी श्री. नितीन परब यांना वसई (जि. पालघर) जवळच्या परमार टेक्नो सेंटरच्या परिसरात एक धूसर सुरय (सूटी टर्न) गलितगात्र अवस्थेत आढळून आला. त्याच्या पाठीवर छोटेसे यंत्र अर्थात जीपीएस लॉगर (GPS logger) लावलेले होते. त्यांनी हा पक्षी जवळच्या वळीव येथील पोलीस स्टेशनला सुपूर्द केला. तेथून तो बोरिवली (जि. मुंबई) येथील संजय गांधी नॅशनल पार्क येथे उपचारासाठी पाठविण्यात आला. येथे उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

जीपीएस लॉगरवर १८३०१६ हा क्रमांक होता. वरील बाजूस सौर ऊर्जेचे चार्जिंग पॅनल असून खालील बाजूस डॉ. ख्रिस्तोफर फेरे ह्यांचा ईमेल दिलेला होता. उजव्या पायात असलेल्या ॲल्युमिनियमच्या वाळयावर (रिंग) टाकलेला क्रमांक DT 75528. BTONHMSEUM LONDON. SW.WWW.NNG.AC असा होता. गूगल सर्च करताच ही रिंग लंडन (इंग्लंड,यू.के.) येथील ब्रिटिश ट्रस्ट ऑफ ऑर्निथॉलॉजी (बीटीओ) ह्या संस्थेने त्यांना उपलब्ध करून दिली होती असे स्पष्ट झाले.बोरिवली येथील रेंज फॉरेस्ट ऑफिसर श्री. विजय बारब्दे ह्यांनी जीपीएस लॉगरवर घातलेल्या डॉ. ख्रिस्तोफर फेरे ह्यांच्या ईमेलवर संपर्क साधला.


सेशेल्स हे बेट आफ्रिका खंडाच्या पूर्व दिशेला हिंद महासागरात असून या ठिकाणी बर्ड आयलँडवर अनेक समुद्र पक्ष्यांची मोठ्या प्रमाणावर वीण होते. डॉ. क्रिस्तोफर आणि त्यांची चमू गेल्या अनेक वर्षांपासून समुद्रातील अशा सुदूरच्या बेटांवर वीण करणाऱ्या

पक्ष्यांचा अभ्यास करीत आहे.

डॉ. ख्रिस्तोफर ह्यांच्या चमूने दि. २७ ते ३० ऑगस्ट २०१९ दरम्यान धूसर सुरयच्या एकूण १५ पिल्लांच्या पाठीवर जीपीएस लॉगर यंत्रे बसविली होती. ह्यातील १३ पक्षी एका महिन्यात त्यांच्या जन्मस्थळापासून १,००० किमी दूरपर्यंतच्या परिसरात अर्थात समुद्रावर – विशेष करून अरबी समुद्रात विहरत होते.मी वसईला मिळालेल्या सुरय पक्ष्याच्या स्थलांतराचा नकाशा तयार केला तेव्हा असे लक्षात आले की सेशल्स बेटापासून वसईचे सरळ रेषेतील अंतर ३,२२८ किलोमीटर एवढे आहे. अर्थात समुद्रीपक्षी सरळ रेषेत कधीच उडत नसतात तर ते समुद्रावरील हवामानाचा अंदाज घेऊन मुशाफिरी करीत असतात. डॉ. क्रिस्तोफर यांचा चमू धूसर सुरयची पिल्लं ज्यावेळेस घरट्यातून उडून जाण्यासाठी सज्ज होतात(पण उडू शकत नाहीत) त्यावेळेस त्यांना पकडून त्यांच्या पाठीवर ट्रान्समीटर बसवितात तसेच पायात वाळे घालतात.

डॉ. क्रिस्तोफर ह्यांनी त्यांच्या ब्लॉगवर टाकलेली माहिती अशी की, ऑगस्ट २०१९ मध्ये पाठीवर जीपीएस लॉगर लावलेल्या ह्या सुरय पक्ष्याने ऑगस्ट महिन्याच्या शेवटी बर्ड आयलँड सोडले. त्याच्यासोबत टॅग केलेल्या इतर १५ सुरय पक्ष्यांप्रमाणेच तो बर्ड आयलँडच्या (सेशेल्सच्या) उत्तरेला अर्थात अरबी समुद्रात मुशाफिरीला निघाला. पुढे हजारो किलोमीटरची मजल मारीत हिन्दी महासागराच्या वायव्येला झेपावत त्याने सोमालिया, केनिया, आणि उत्तर टांझानियाच्या किनाऱ्यालगतच्या समुद्रात विहार केला. १३ जुलै २०२० ला सोकोत्रा बेटापासून ४५० किलोमीटर पूर्वेला तो होता. त्यानंतर मात्र पूर्वेकडे वाहणाऱ्या जोरदार मोसमी वादळाच्या तडाख्यात तो सापडला. त्याने वादळ टाळण्यासाठी पूर्वेकडे अर्थात भारताच्या पश्चिम किनाऱ्याकडे उडायला सुरुवात केली. पण वादळी हवामानाने त्याचा पिच्छा सोडला नाही. त्यामुळे अगदी थकलेल्या अवस्थेत त्याला वसईचा किनारा गाठावा लागला. अर्थात पुढे काय घडले ते वर दिले आहे. स्थलांतरित पक्षी उत्तरेकडून दक्षिणेकडे प्रवास करतात असा आपला समज असतो. अनेक पक्षी वेगळ्या मार्गावर मुशाफिरी करतात त्याचे हे उदाहरण! या लेखात केवळ मोजक्याच पक्ष्यांच्या स्थलांतराची माहिती दिलेली आहे.

*****












# १९ व्या शतकातील खानदेश जिल्ह्याचे पक्षी वैभव



-प्राचार्य डॉ. सुधाकर कुऱ्हाडे
अहमदनगर.
संपर्क : 9850291324
sudhakarkurhade@gmail.com

ब्रिटिश राजवटीमध्ये खानदेश प्रदेश म्हणून जो भूभाग ओळखला जात होता, त्याचे क्षेत्रफळ होते १०४३१ चौरस मैल आणि याचा विस्तार मुख्यत्वे करून दख्खनच्या पठाराच्या उत्तरेस होता. प्रशासकीय सोयीसाठी खानदेश पुढील १६ उपविभागांमध्ये विभागण्यात आला होता. अमळनेर, भुसावळ, चाळीसगाव, चोपडा, धुळे, एरंडोल, जामनेर, नंदुरबार, नसिराबाद, पाचोरा, पिंपळनेर, सावदा, शहादा, शिरपूर, तळोदा आणि विरदोल (रानपिंगळ्यांमुळे तळोद्याचे नाव आज सर्वच अभ्यासकांना ज्ञात आहे.) खानदेशात सातपुडा पर्वतरांगा हत्ती पर्वतरांगा, अजिंठा आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांचा विस्तार दिसून येतो. या पर्वतरांगांच्या डोंगर उतारावर नानाविध वृक्ष-वेली गवते आढळून येत असत. खानदेशात चार उष्ण पाण्याचे झरे असल्याचीही इतिहासात नोंद आहे.

तत्कालीन राजवटीमध्ये खानदेश हा विस्तृत वनप्रदेश असलेला जिल्हा होता. तथापि १८६० नंतर टिंबर ठेकेदारांनी या वनांचे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करून नुकसान केले. इ.स. १८६३ साली खानदेश आणि अहमदनगर वन विभाग एकाच युरोपियन अधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली होते. तत्कालीन खानदेशात वीस राखीव वनक्षेत्रे असल्याचा उल्लेख आहे.  या वनांमध्ये साग, खैर, अंजन, मोह, आपटा, सलाई, बाभूळ, बांबू आदी उपयुक्त वृक्षराजी असल्याने त्यांच्या व्यापाराच्या दृष्टीनेही खानदेश महत्त्वाचा होता. सी.एस. हॉर्सली (उ.ड. कीश्रशू) या अधिकाऱ्याने सातपुड्यातील भिल्ल समाजाच्या दैनंदिन गरजा ओळखून त्यांना वृक्षतोडीस सशर्त परवानगी दिली होती. मोहाची फुले, फळे आणि चारोळी विक्रीतूनही या समाजाच्या उदरनिर्वाहाला हातभार लागत असे.

वर उल्लेखित वृक्षासोबतच खानदेशच्या जंगलात शेवगा, अंजन, धावडा, बेल, वड, पिंपळ, उंबर, बेहडा, अर्जून, वहावा, कदंब, बिबा, बोर, बकान, जांभूळ, चिंच, खुरड, खैर, आंबा, बोदरा, पांगारा, चंदन, भोकर, शिरीष, ऐन, शिसम, शिंदी आदी अनेक वृक्ष मोठ्या संख्येने, दाटीवाटीने उभे असल्यामुळे साहजिकच या वनांमधील पशु-पक्षी सृष्टी ही लक्षवेधी होती.

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत खानदेशाच्या उत्तरेकडील पर्वतरांगांमध्ये हत्तींचे वास्तव्य (आणि वीण ही) मोठ्या प्रमाणात होते. परंतु नंतरच्या मुगल कालखंडात नानाविध कारणांमुळे हत्तींची संख्या कमी-कमी होत गेली. वाघ आणि बिबटे पूर्वीपासूनच या प्रदेशात वास्तव्यास आहेत. यांच्या सोबतच गवा, अस्वल, रानडुक्कर, सांबर, चितळ, भेकर, चिंकारा, काळवीट, नीलगाय इत्यादी वन्यजीव या वनांमध्ये आढळून येतात.

तत्कालीन खानदेश जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ आणि वनक्षेत्र मर्यादित असले तरीही या प्रदेशाची जैवविविधता समृद्ध होती, हे तेथील वृक्ष आणि वन्यजीवांवरून स्पष्ट होते. जल, जंगल, जमीन ही त्रिसूत्री त्या काळातही एकात्मिक भावनेनं कार्यरत होती, हे अनेक दस्तऐवजांवरून सिद्ध होते. रानावनात पक्ष्यांचा किलबिलाट नसला तरच नवल. एकोणिसाव्या शतकामध्ये खानदेशातील पक्षी जीवन हे अतिशय समृद्ध बहरलेले होते, हे इ.स. १८८० च्या शासकीय नोंदीवरून लक्षात येते. जल आणि जंगल यामुळे पक्ष्यांचे अधिवासही नोंद घेण्यायोग्यच होते. वड, पिंपळ, लिंब, ऐन यासारखी झाडे पक्ष्यांना आश्रय द्यायची तर भोकर, बोर, चिंच, पळस, उंबर आदी वृक्षराई पक्ष्यांची भूक भागवायची. सोबतीला तापी, गिरणा, बोराई, नर्मदा या अमृतवाहिन्या होत्याच. एकूण काय खानदेशचा हा परिसर पक्ष्यांसाठी एक आदर्श अधिवासच होता.

महाराष्ट्रातून माळढोक दुर्मीळ होत चालल्याच्या पार्श्वभूमीवर कधीकाळी खानदेशातही माळढोक आणि तणमोराचेही सहज दर्शन होत असे. हा इतिहास १८५० ते १८८० दरम्यानचा असावा. आज १७० वर्षांनंतर पाहिले तर या परिसरात माळढोक दिसून येत नाही आणि तणमोर असलाच तर त्याच्या अधिवासाबद्दल खूप काही माहीत नाही. पाणी आणि गवताळ प्रदेश यामुळे सामान्य बटलावा, पट्टेरी बटलावा, टिटवी, माळ टिटवी यांसारखे पक्षी तर विस्तृत पाणथळींमुळे चक्रवाक, अडई, थापट्या, तलवार बदक, हळदी-कुंकू, गडवाल, शेंडी बदक, पाणडुबी, नकटा, तिरंदाज आदी स्थानिक आणि स्थलांतरित पक्षी खानदेश जिल्ह्यात आढळून येत. हा पक्षी अभ्यास, पक्षी नोंदीचा सारा खटाटोप तत्कालीन ब्रिटिश, युरोपियन अधिकाऱ्यांनी केला. यातून त्यांचे निसर्गप्रेमच दिसून येते.

ब्रिटिश आणि मोगल काळात वन्यजींची सर्रास शिकार केली जात होती, हे सर्वश्रुत आहे. शिकारीसाठी खास 'मृगयाक्षेत्र' राखीव ठेवले जायचे. ही अधिकारी, राजे, संस्थानिक मंडळी फक्त वन्यपशूंचीच

शिकार करायचे, असे नाही तर ही हौशी, खवैय्ये मंडळी स्थानिक आणि स्थलांतरित बदकांचीही शिकार करायचे. याविषयी अनेक शास्त्रीय नियतकालिकातून त्यांनी वेळोवेळी टिपणं प्रकाशित केली आहेत. सातपुडा पर्वतरांगांमुळे एक परिपूर्ण अधिवास गिधाडांसारख्या पक्ष्यांना लाभल्यामुळे पांढऱ्या पुठ्ठ्यांचे गिधाड, पांढरे गिधाड, लांब चोचीचे गिधाड आणि काळे गिधाड ही या जिल्ह्यात भरपूर संख्येने दिसून येत होती. या गिधाडांच्या अस्तित्वावरून त्या परिसरात पशुधन (गाय, बैल, म्हैस इत्यादी) आणि वन्यपशूही मोठ्या संख्येत असावीत, हे मानण्यास हरकत नसावी. मोर, घारीसारखे शिकारी तेथे सहज दिसत. इतर शिकारी पक्ष्यांमध्ये तिसरा, मधुबाज, शिक्रा, शाहीन ससाणा, लग्गड ससाणा, लाल डोक्याचा ससाणा, नागरीघार, ब्राह्मणी घार यांचा समावेश होता.

सध्याच्या परिस्थितीत आजच्या पक्षी मित्रांमध्ये खानदेशची पक्षी ओळख आहे ती फॉरेस्ट आऊलेट अथवा 'रानपिंगळ्या'मुळे आणि याचे निर्विवाद श्रेय जाते पामेला रासमुसन, बेन किंग आणि गिरीष जठार या संशोधकांना. २००१ ते २००४ या कालावधीत जठार यांनी या रानपिंगळ्याचा सखोल शास्त्रीय अभ्यास करून 'डॉक्टरेट' ही सर्वोच्च पदवी प्राप्त केली. यामुळेच तळोदा-रानपिंगळा - डॉ. गिरीष जठार हे समीकरण सर्वच पक्षी अभ्यासकांना परिचित आहे. यापूर्वीही म्हणजे सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी तळोदा आणि शहादा या परिसरातून फॉरेस्ट आउलेट अथवा रानपिंगळ्यांची नोंद घेण्यात आली होती. इ.स. १८८० ते १८८३ या कालावधीत तत्कालीन भारतीय प्रशासकीय सेवेतील पक्षी अभ्यासक अधिकारी जेम्स डेव्हिडसन यांनीदेखील पश्चिम खानदेशातून या दुर्मिळ पक्ष्यांची नोंद घेतली होती.

या रानपिंगळ्यांशिवाय मासेमार घुबड, हुमा घुबड, ठिबकेवाला पिंगळा, छोट्या कानाचे घुबड, गव्हाणी घुबड ही निशाचर मंडळीही खानदेशातील पक्षी वैभवाचे घटक होते.

पाकोळी, माळ भिंगरी, रेषाळ कंठाची भिंगरी, पर्वतीय पाकोळी, तुरेवाली पाकोळी हे पक्षी खानदेशच्या आसमंतात सकाळच्या वेळेस हमखास दिसून येत.

रातवा, चाष, तीनही प्रकारचे धीवर, वेडा राघू, राखी धनेश, पोपट, सुतार, चातक, दोन प्रकारचे तांबट, सामान्य कोकिळ, भारतीय कोकिळ, भारद्वाज, हुप्पो आदी नानाविध रंगाचे पक्षी खानदेशातील जंगलाची शोभा वाढवत असत. जेम्स डेव्हिडसन यांच्या सूचीनुसार एकोणिसाव्या शतकात (इ.स. १८०० ते १९९०) त्यांनी ज्या उत्तर-पूर्व खानदेशात जास्त प्रवास केला, वास्तव्य केले, त्या प्रदेशात तेथील डोंगर-रांगांमध्ये २९४ प्रजातींचे पक्षी नोंदविले. पैकी काही दहा-बारा पक्ष्यांच्या बाबतीत ते साशंक होते, हेदेखील त्यांनी प्रामाणिकपणे नोंदविले आहे. जेम्स डेव्हिडसन या सनदी अधिकाऱ्याच्या पक्षिविषयक नोंदी तत्कालीन ख्यातनाम पक्षितज्ज्ञ ह्यूम यांनी तपासून त्या पक्षिविषयक शास्त्रीय नियतकालिकात प्रसिद्धही केल्या.

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश अधिपत्याखाली असलेल्या 'खानदेश जिल्ह्याची' ही पक्षीसृष्टी आजही नवलाईचा विषय बनून राहिली आहे. 'रानपिंगळ्या'च्या नोंदीने आणि संशोधनातून हा अधिवास जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाचा होता आणि आहे, हे अधोरेखित केले आहे.

*****



**आकाशवाणी व्याख्यान मालिका**

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या निवडक सभासदांचे नागपूर आकाशवाणीवर 'पर्यावरण वार्ता' या सदरात विविध विषयांवर २० मे ते २८ मे २०२१ या दरम्यान दररोज लघुभाषण मालिका प्रसारित करण्यात आली. या कार्यक्रमात सहभागी सर्व सदस्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

व्याख्याते पक्षिमित्र आणि विषय याप्रमाणे : १) श्री. किरण मोरे (अमरावती) 'पक्ष्यांचे स्थलांतर व प्रजनन), २) सौ. ऐश्वर्या भोसले-पवार (सातारा) 'महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन आणि पक्षिनिरीक्षणाची सुरुवात, ३) श्री. मनोज बिंड (अमरावती) 'पक्ष्यांचे छायाचित्रण', ४) डॉ. संदीप साखरे (अकोला) 'पक्षी-सहउत्क्रांती', ५) श्री. हेमराज पाटील (चोपडा, जि. जळगाव) 'जागतिक चिमणी दिवस आणि चिमणी संवर्धन'.

**अभिनंदन**

आपले अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांना त्यांच्या रानपिंगळा (अज्ञातवास व पुन र्शोध) या पुस्तकासाठी स्व. मातोश्री सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे राज्यस्तरीय मराठी वाङ्मय पुरस्कार प्राप्त झाला.

'पक्षिमित्र'तर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

**पक्षी मगरीचे नातेवाईक!**

पक्ष्यांचे पूर्वज एकेकाळी पृथ्वीवर वावरणारे अजस्त्र डायनासोर आहेत, याबद्दल आता बहुतेक शास्त्रज्ञांचे दुमत नाही.

पक्ष्यांच्या पाठीला कणा असतो, त्यामुळे ते कणाधारी प्राण्यांचे नातेवाईक ठरतात. ते मगरीचे नातेवाईक आहेत, हे ऐकून सर्वांना आश्चर्य जरूर वाटेल.

**नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यात दीर्घकाळानंतर माळढोकचे दर्शन**

नागपूर जिल्ह्यातील ठेमसाना व चंद्रपूर जिल्ह्यात वरोरा येथे नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला माळढोक पक्षी दिसून आले आहेत. तीन वर्षांपूर्वी वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने केलेल्या सर्वेक्षणांती महाराष्ट्रात एकही माळढोक आढळला नव्हता. त्यामुळे तो राज्यातून नामशेष झाला असावा, असे मानले जात होते.

माळढोक वाचवण्यासाठी वीजवाहिन्या भूमिगत करण्याचा राष्ट्रीय हरित लवादाचा आदेश

माळढोक पक्ष्याचे अस्तित्व असलेल्या राज्यांमध्ये वीज प्रकल्पांचे नूतनीकरण करताना सर्व वीजवाहिन्या भूमिगत असाव्यात, असा आदेश राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) ने दिला आहे. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने तसेच संबंधित राज्यांनी विद्यमान सौर आणि पवन ऊर्जा वाहिन्यांवर पक्ष्यांना परतवून लावणारे उपकरण चार महिन्यांच्या आत बसविण्याचे आदेशही लवादाने दिले आहेत.

(महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र, खंड-२, अंक १ वरून)

**लेखकांसाठी पुनश्च एकवार सूचना**

आपले सभासद 'पक्षिमित्र'साठी लिहू लागले आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे; पण उत्साहाच्या भरात केलेल्या लेखनात अनेकदा शुद्धलेखनाच्या, वाक्य रचनेच्या चुका राहून जातात. मजकूर इतका दाटीने लिहिलेला असतो की, त्या चुका सुधारण्यासाठी जागाच उपलब्ध नसते. तेव्हा मजकूर लिहिताना दोन ओळीत अंतर व दोन्ही बाजूस जागा सोडलेली असावी.

मजकूर संपादकाच्या पत्त्यावर टपालाने अथवा ई-मेलने पाठवावा. वॉट्सॲपवर पाठवू नये.

वरीलप्रमाणे काळजी घेतलेली नसल्यास लेख छापला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

**अभिनंदन**

आपल्या संस्थेचे पूर्वाध्यक्ष श्री. भाऊ काटदरे यांच्या सह्याद्री मित्र या संस्थेच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनाचे कार्य करत असतात. पांढऱ्या पोटाचा समुद्री गरुड यांची घरटी शोधणे, वेंगुर्ला रॉक्सजवळ होणारी पाकोळ्यांची चोरटी विक्री, वेळास समुद्र किनाऱ्यावर घातल्या जाणाऱ्या कासवांच्या अंड्यांचे संरक्षण, खवले मांजर वाचवा मोहीम आदी कार्याची दखल महाराष्ट्र शासनाच्या १२ वीच्या इतिहासविषयक पुस्तकात आवर्जून घेतली आहे.

तसेच महाड येथील आपले सभासद श्री. प्रेमसागर मेस्त्री यांनी त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून पांढरपाठी गिधाडाच्या संरक्षणासाठी प्रयत्न केले. त्याचा उल्लेखही वरील पुस्तकात आला आहे. सर्वश्री काटदरे आणि मेस्त्री यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'पक्षिमित्र'तर्फे अभिनंदन.

**सहवेदना**

पुणे येथील आपले एक सभासद डॉ. रमेश गोडबोले यांचे निधन झाले. अकरा दिवसांच्या अंतरात त्यांच्या दोन भावांचेही निधन झाले.

डॉ. रमेश गोडबोले हे निसर्गसेवक संस्थेचे अनेक वर्षेकार्याध्यक्ष होते. आपल्या प्रियजनांच्या स्मरणार्थ लोकांनी एक वृक्ष लावण्यासाठी संस्थेकडे निधी दिल्यावर त्या वृक्षाच्या जतनाची जबाबदारी संस्था स्वीकारते. या स्मृतिवनामुळे एक टेकडी हिरवीगार झाल्यावर जागा शिल्लक न राहिल्याने महापालिकेने दिलेल्या दुसऱ्या जागेवर स्मृतिवन साकार होऊ लागले आहे.

डॉ. रमेश गोडबोले यांना 'पक्षिमित्र'कडून श्रद्धांजली.

**चिमणी झिंदाबाद**

अलीकडच्या एका पाहणीत जगात एकंदर ५० अब्ज पक्षी असावेत, असा अंदाज करण्यात आला आहे. म्हणजे एका व्यक्तीमागे ६ पक्षी झाले. हा अंदाज बरोबर आहे का, हे पाहण्यासाठी जागतिक

महत्त्वाच्या तीन संस्थांनी जमा केलेली आकडेवारी विचारात घेतली गेली. पाहणीत आलेल्या ९७०० प्रजातींच्या अभ्यासातून ४ प्रजाती 'अब्जाधीश' निघाल्या. त्यातून पहिला क्रमांक मिळवला चिमण्यांनी. त्यांची संख्या भरली १.६ अब्ज, दुसऱ्या क्रमांकावर युरोपीयन मैना १.३ अब्ज, त्या मागोमाग रिंग बिल्ड गल १.२ अब्ज आणि नंतरचा क्रमांक बार्न स्वॅलोचा १.१ अब्ज.

११८० प्रजातींमध्ये (म्हणजे एकंदर पक्षी संख्येच्या १२ टक्के) ५००० पेक्षा कमी आहेत. सगळ्यात कमी आहेत सेचलिस केस्ट्रल १०० हून कमी. किवींची संख्या भरली ३७७, जावा हॉक इगल ६३०. पुढच्या पाहणीपर्यंत हे तिन्ही पक्षी कदाचित नामशेष होतील.

यापूर्वीची पाहणी २४ वर्षांपूर्वी झाली होती. तीत एकंदर पक्ष्यांचा अंदाज होता २०० ते ४०० अब्जांदरम्यानचा.

**नवे सदर आपल्या माहितीला उजाळा**

महाराष्ट्र पक्षिमित्र संघाच्या त्रैमासिकाचे प्रयोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख यापर्यंतच मर्यादित राहत नाही. या सल्गनीत ज्ञान भांडाराची उजळणी करून घेण्यासाठी 'आपल्या माहितीला उजाळा' हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या माहितीला उजाळा द्यायचा आहे. प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवेल, अशी अपेक्षा आहे. वाचक आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरांसोबत पडताळून पाहू शकतात. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

**आपण लिहिता...**

नेहमीप्रमाणे १ एप्रिल २०२१ चा अंक वेळेवर मिळाला. अंक चाळला तर माळढोकच्या मुखपृष्ठाने मन हेरावून घेतले. त्या प्रकाशचित्राविषयी आणखी माहिती दिली तर बरं झालं असतं. दिगंबर गाडगीळ यांचा नेहमीप्रमाणे संवर्धन विषयावर चिंतन करणारे माहितीपूर्ण संपादकीय आहेच. टपाल दुनियेची सफर अविरत चालू आहे. माणिक पुरी यांच्या लेखनातून काही महत्त्वपूर्ण अनुभव व संदर्भ मिळाले. पूजा, राजकमल, ऐश्वर्या आणि चिन्मय यांचे प्रासंगिक वाचण्याजोगे आहे. पक्षीशास्त्राविषयी ज्ञान वृद्धिंगत करणारे अमोल, नागेश आणि संदीप यांचे लेखन उपयोगी आहे. सातपुडा निसर्ग संवर्धन संस्थेला पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा. एकूणच पक्ष्यांच्या अनेक रंगीबेरंगी चित्रांनी अंक सुंदर झाला आहे.

-राघवेंद्र वंजारी
rvanjari@yahoo.co.in

*****

# होप, ठाणे तर्फे दिले जाणारे उदयोन्मुख्र पक्षीनिरीक्षक व उदयोन्मुख्र पक्षीमित्र पुरस्कार जाहीर



चि. चिन्मय प्र.सावंत



कु. मृणाली क.राऊत



श्री. राहुल श्री. वंजारी

ठाणे येथील हियर ऑन प्रोजेक्ट एनव्हानमेंट अर्थात होप (HOPE) या संस्थेकडून महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनामध्ये दरवर्षी दोन पुरस्कार दिले जात असतात. नवीन पक्षी निरीक्षक व पक्षी अभ्यासक घडावेत, यासाठी, पक्षी अभ्यासात रुची दाखविणारे, अगदी शाळा महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी यांना प्रोत्साहन देण्यासाठी होप या संस्थेकडून उदयोन्मुख पक्षीनिरीक्षक व उदयोन्मुख पक्षिमित्र असे दोन पुरस्कार दरवर्षी दिले जात असतात. या पुरस्कारासाठी महाराष्ट्र पक्षिमित्र कडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यामधून पक्षी निरीक्षण व पक्षी अभ्यास या क्षेत्रात नव्याने सुरुवात करून उत्कृष्ट कार्य करून आदर्श निर्माण करणाऱ्या तरुण पक्षी निरीक्षकांची निवड करण्यात आली आहे. उदयोन्मुख पक्षीनिरीक्षक पुरस्कार, किरकसाल जि. सातारा येथील चि. चिन्मय प्रकाश सावंत यांस, तर उदयोन्मुख पक्षीमित्र पुरस्कार, सोलापूर येथील श्री. राहुल श्रीकृष्ण वंजारी व साकोली जिल्हा भंडारा येथील कु. मृणाली कमलाकर राऊत यांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे.

उदयोन्मुख पक्षीनिरीक्षक व उदयोन्मुख पक्षिमित्र या पुरस्कारांसाठी पुरस्कार राशी प्रत्येकी रु. २५००/- रक्कम, व प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. या पुरस्काराचे वितरण येत्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार आहे. यावर्षी ३४ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन सोलापूर येथे होणार असून या पुरस्कारांचे वितरण या संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

**एका माणसाने खरंच वाटीभर पाणी पक्ष्यांसाठी ठेवले आणि पुढे काय घडलं?**
**त्या पक्ष्यांमधे आणि माणसामध्ये काय संवाद झाला? त्याचे वर्णन खालच्या कवितेत केलंय.**
(Unfortunately **कविवर्यांचे नाव कळले नाही**)

वाटीत पाणी बघता । ऐटीत पक्षी आला ।
चोचीत थेंब घेता । मनामध्ये म्हणाला ।।

येतो घेऊनी आता । घरट्यातल्या पिलाला ।
सोय आजची हि झाली । भय उद्याचे कशाला ।।

वाटीतल्या जळाची । चर्चा चिकार झाली ।
गावात विहगांच्या । सभेत नोंद झाली ।।

आहे कुणीतरी या । गावात चांगाला बा ।
पात्रात पाणी ठेवी । म्हणतो आम्हास हे घ्या ।।

धामात सज्जनाच्या । काही पक्षीगण गेले ।
हालवित पंख छोटे । त्यातील एक बोले ।।

पात्रात पाणी या का । आम्हास ठेवले तू ।
नाही मनुष्य आम्ही । तरी परोपकारिले तू ।।

जातीस जात भीते । हे दीस आजचे आले ।
माणूस माणसाशी । आज शत्रुसमान वागे ।।

हे रोज पाहण्याची । सवय आम्हाला झाली ।
हे असे असता पाणी । कोण परांस घाली? ।।

हे पहावया मनुजा । तुझ्या समीप आलो ।
उपकार कसा मी घेउ? । म्हणून बोलता झालो ।।

ऐकून प्रश्न भोळा । यजमान सुन्न झाला ।
लज्जीत वदनाने । पुढे बोलता झाला ।।

हे दान नाही मित्रा । उपकार फेडतो मी ।
वाटीतल्या जलाचे । काज सांगतो मी ।।

तोडले वृक्ष आम्ही । निसर्ग उजाड झाला ।
उखडून घरटी तुमची । विश्राम आम्ही केला ।।

वनास तोडून आम्ही । शहरात वास केला ।
उत्तुंग इमारतीचा । आम्हीच माज केला ।।

परंतु विश्रामधामी । विश्रांती ना मनाला ।
तळमळ अंतरीची । न सांगता ये कुणाला ।।

यंत्रे शोधुनी आम्ही । श्रमचोर जाहलो रे ।
लाडावुनि गात्रे । रोगांत ग्रासलो रे ।।

आरवशी प्रभाती तू । नी जातो मनाचा शीण ।
गुंताडल्या मनांची । का सहजी सुटे रे वीण ।।

सरसावशी आकाशी । मी पहातो तुझी भरारी
मरगळल्या मनाला । येते पुन्हा उभारी ।।

आकाश कवेत घेता । करतोस येरझारा ।
पाहुनी कसरती त्या । मी विसरतो देहभाना ।।

पहाटे जाग येते । तू सुरात जेव्हा गातो ।
कोण मनुष्य प्राणी । काय तुलारे देतो? ।।

बोल कृतज्ञतेचे । ऐकून त्या जनाचे ।
जलप्राशनामिषेने सारा । पक्षीवृंद नाचे ।।

# टपाल तिकिटांच्या दुनियेत

## पाणचिरा

### Indian Skimmer (Rynchops albicollis)

इंडियन स्कीमर या पक्ष्यास हिंदीमध्ये कैची बिल व मराठीमध्ये पाणचिरा या नावाने संबोधले जाते. जगामधील स्कीमरच्या तीन प्रजातींपैकी ही एक प्रजाती आहे. भारतीय स्कीमर हा अत्यंत देखणा पक्षी आहे. याचे शरीर पांढऱ्या रंगाचे असते. डोक्यावर काळी टोपी असते. पंख व शरीराचा वरील भाग काळ्या रंगाचा असतो. चोच नारिंगी रंगाची असते. चोचीचा खालील भाग वरील भागापेक्षा मोठा असतो.

हा पक्षी प्रामुख्याने भारत व पाकिस्तानमध्येच आढळून येतो. त्यांची संख्या भारतामध्ये ६००० ते १०००० पर्यंत मर्यादित असल्याचा अंदाज आहे. भारतातील चंबळ व महानदीच्या खोऱ्यात यांचे प्रजननस्थान आहे. हा पक्षी बहुतांशी मासे खातो तसेच पाण्यातील इतर जीवजंतूसुद्धा खातो. इतर पक्ष्यांसोबत गटाने राहणारा हा पक्षी जास्त करून सुरय जातीच्या पक्ष्यांसोबत असतो. अधिवासाचा ऱ्हास, जल व वायू प्रदूषणामुळे या पक्ष्याच्या अस्तित्वास धोका निर्माण झाला आहे. भारतीय स्कीमर हा पक्षी आययूसीएनच्या लाल सूचीनुसार 'संकटग्रस्त' म्हणून नोंदवला गेला आहे. मागील डिसेंबर महिन्यात भारतीय स्कीमरचा २३० पक्ष्यांचा समूह काकीनाडा तटावर कुंभाभिषेकम खाडीमध्ये आढळून आला होता.

या दुर्लभ अशा प्रजातीच्या संरक्षणाबाबत जनतेमध्ये जागृती होण्याच्या उद्देशाने आंध्र प्रदेश टपाल विभागातर्फे काकिनाडा येथे ९ एप्रिल २०२१ रोजी भारतीय स्कीमर या पक्ष्यावर विशेष आवरण प्रसिद्ध केले आहे. आवरण चित्रावर भारतीय स्कीमर पक्षी पाण्यात विहार करताना दिसत आहे. तसेच या पक्ष्याची मुद्रा असलेला शिक्का तिकिटावर मारलेला आहे.

**रवींद्र वामनाचार्य,**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

*****



# महाराष्ट्र पक्षीमित्रचे
## आजच सभासद व्हा

आजीवन सभासद शुल्क रु ५००/– + ५००/– (अंक निधी)
आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

### सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी/मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे अमरावती. येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, गाडगे नगर, अमरावती.
खात्याने नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र,
बँक खाते नं. : ६००३६८१२०१७
IFSC Code - MAHB0000639
खात्यात पैसे भरून त्वरीत मेलने कळविणे, तसेच सभासदाचा अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे. सोबत पे–इन स्लीपची झेरॉक्स जोडावी.

३) पत्रव्यवहाराचा पत्ता :– महाराष्ट्र पक्षीमित्र, द्वारा डॉ.गजानन वाघ अरण्यार्पण, ६३ समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४

Email : pakshimitra@gmail.com
Website : www.pakshimitra.org

### त्रैमासिक अंक निधी

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे मुखपत्र त्रैमासिक अंक पक्षीमित्र हा आपण दर तीन महिन्यांनी प्रकाशित करत असतो. या अंकाला छपाई व पोस्टेज मिळून वार्षिक ५५,०००/– ते ६०,०००/– रुपये खर्च येतो. संस्थेचे नियमित उत्पन्न काहीच नाही त्यामुळे हा अंक परवडत नाही, पक्षीमित्र संस्थेच्या व पक्षी संवर्धन संरक्षण कार्यात या अंकाची अत्यंत आवश्यकता आहे. याचसाठी हा अंक असाच चालू ठेवा असे वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले आहे. याच्या खर्चासाठी त्रैमासिक अंक निधी उभा करण्याचे ठरविण्यात आले आहे. आपण सुध्दा या अंकासाठी देणगी देऊन हातभार लावावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या प्रकल्पाला आपण सुद्धा देणगी देऊन हातभार लावावा ही विनंती.

# महाराष्ट्र पक्षीमित्र

(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

## सभासद अर्ज

प्रति,

मा.अध्यक्ष,

महाराष्ट्र पक्षीमित्र

महोदय,

मला महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/२८५/९८/नागपूर या संस्थेचे नियम व उद्दिष्टे मान्य आहेत. मी शपथपूर्वक सांगतो की, मी सर्व नियमांचे कोटेकोरपणे पालन करीन. मी वरील संस्थेचा आजीवन सभासद होऊ इच्छितो. माझा व्यक्तिगत तपशील खालील प्रमाणे आहे.

संपूर्ण नाव : ______________________

संपूर्ण पत्ता : ______________________

______________________

फोन नं. ____________ मो. ____________

ई–मेल ______________________

जन्मतारीख : ______________________

शिक्षण : ______________________

नोकरी/व्यवसाय : ______________________

छंद : ______________________

माझी वर्गणी सोबत देत आहे (D.D./Money Order / Core Bank System)

कृपया माझी सभासद म्हणून स्वीकृती व्हावी ही नम्र विनंती.

श्री/श्रीमती यांनी सुचविल्यावरुन सभासदत्व घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| दिनांक | **अध्यक्ष** | आपला |
| **अर्ज मंजूर/नामंजूर** | **महाराष्ट्र पक्षीमित्र** | सही |

**टिप** : सभासद अर्ज आपल्या वेबसाईटवर ''<u>ऑनलाईन</u>'' पध्दतीने सुध्दा भरता येईल

**महाराष्ट्र पक्षीमित्र ला देण्यात येणाऱ्या सर्व देणग्या 80 G अन्वये सवलत पात्र आहेत.**

## ❋ भावपूर्ण श्रद्धांजली ❋

**ज्ञानेश्वर ठाकूर, खारघर**



महाराष्ट्र पक्षिमित्रचे जेष्ठ सभासद श्री ज्ञानेश्वर ठाकूर, खारघर यांना ८ मे २०२१ रोजी कोरोनामुळे देवाज्ञा झाली. पक्षांची छायाचित्रे काढून, त्यांची व्हिडिओग्राफी करून ते त्यावर माहितीपट तयार करून युट्यूबवर उपलब्ध करून देत असत आणि त्याची लिंक आपल्या ग्रुपमध्ये नियमितपणे पाठवीत असत. शाळांमध्ये जाऊन मुलांना पक्षी विषयक माहिती देण्याचे कार्य त्यांनी निवृत्ती नंतर सुरू केले होते. महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पक्षिमित्र कै. ज्ञानेश्वर ठाकुर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

❋❋❋❋❋

**कार्तिकस्वामी इंगळे, अहमदनगर**



रविवार दिनांक २ मे २०२१ रोजी महाराष्ट्र पक्षिमित्रचे जेष्ठ सभासद श्री. कार्तिकस्वामी इंगळे यांचे दुःखद निधन झाले. भारतीय स्टेट बँकेमधून निवृत्त झालेले श्री इंगळे यांनी निवृत्तीनंतर पक्षी अभ्यास व पक्ष्यांचे फोटो काढणे हा छंद जोपासला होता. संमेलनामध्ये उत्स्फूर्त सहभाग आणि नवोदितांना ते सतत मार्गदर्शन करायचे. गुजरात मध्ये पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय पक्षी विषयक परिषदेमध्ये सुद्धा सहभाग घेतला होता.त्यांनी पक्ष्यांसाठी गुजरातमधील नलदमयंती सरोवर, लोथल, थारचे वाळवंट (wild ass sanctuary ), जैसलमेर या भागात सुद्धा सहल केली होती. पक्षी निरीक्षणाचे निमित्ताने त्यांच्या परिसरातील कापूरवाडी, पिंपळगाव माळवी येथील तलाव, जायकवाडी धरण परिसर, दहिफळ, उजनी जलाशय परिसर या ठिकाणी नियमितपणे जात असत. पक्षीमित्र संमेलनात निसर्ग मित्रमंडळाचे सभासदासोबत त्यांचा सहभाग असायचा.

❋❋❋❋❋

**लतिश डेकाटे, चंद्रपूर**



आपले सहकारी, महाराष्ट्र पक्षिमित्रचे आजिवन सभासद, प्रसिद्ध वन्यजीव व पक्षी छायाचित्रकार, चंद्रपूर येथील लतिश डेकाटे यांना १४ मे २०२१ देवाज्ञा झाली. गेल्या काही दिवसांपासून ते कॅन्सर आजाराशी सामना करीत होते व त्यातून बरे होऊन पुन्हा पक्षी अभ्यास आणि फोटोग्राफी सुरू केली होती. ताडोबा परिसरात गेल्या २० वर्षापासून सातत्याच्या भटकंती मधून त्यांनी पक्ष्यांचे आणि वन्यजीवांचे खूप सुंदर छायाचित्रे त्यांच्या संग्रही होते. गेल्या काही दिवसापासून त्यांचा कॅन्सरचा आजार पुन्हा बळावल्यामुळे त्यातच त्यांचे दुःखद निधन झाले.

**ईश्वर मृतात्म्यास शांती देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना**

**।। महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली ।।**

**Book Post**

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*

**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक
मुद्रक : ज्ञानपथ प्रिंटर्स अॅन्ड ग्राफिक्स, अमरावती